नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com



* वर्ष ३४ * अंक ६४ * * यवतमाळ * शुक्रवार, दिनांक ५ सप्टेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

## खरीखरी..

### सामान्य जनोपयोगी

कालच केंद्रीय अर्थमंत्री, राज्यांचे मुख्यमंत्री त्यांची जीएसटी बाबत बैठक पार पडली. या बैठकीत सध्या जीएसटीचे दर जे चार टप्प्यांमध्ये आहेत त्यांना दोन टप्प्यात आणण्याचा निर्णय पक्का झाला. यामुळे अनेक मध्यमवर्गियांना दिलासा मिळणार आहे. आजच्या या निर्णयामुळे पाच टक्के, बारा टक्के, १८ टक्के आणि २८ टक्के अशा चार स्लॅबमध्ये असलेली जीएसटी आता फक्त पाच आणि १८% झालेली आहे. हे दोनच स्लॅब आता शिल्लक उरलेले आहेत. यामुळे मध्यमवर्गीयांच्या खर्चात निश्चितच बचत होणार आहे. चार स्लॅब ठेवले म्हणून अनेक दिवसांपासून काँग्रेस पक्षाचा या विरोधात प्रचार सुरू होता. आता येत्या नवरात्र उत्सवाच्यापूर्वी सामान्य आणि मध्यमवर्गीय जनतेला दिलासा मिळेल १२% आणि २८% हे दोन स्लॅब रद्द केल्यामुळे १२% तील बहुतेक वस्तू पाच टक्क्यांवर येतील. जीएसटी परिषदेने अनेक वस्तूंचा कर कमी केल्यामुळे बहुतेक सर्व राज्यांनीच आपले नुकसान होईल त्याची भरपाई केंद्राने करावी अशी मागणी केलेली आहे. आधीच देशातील बऱ्याच राज्यांची परिस्थिती फारशी चांगली नाही अनेक फुकट्या योजनांमुळे आणि भरमसाठ खर्चामुळे प्रत्येक राज्य कर्जाच्या विळख्यात सापडलेले आहे. यामुळे केंद्राला याचाही विचार करावा लागेल, एकेकाळी उत्पन्नाचा मोठा स्त्रोत असलेल्या जीएसटीला अशा प्रकारे कमी करण्यात आल्यामुळे देशातील सर्वच राज्य सरकारांना चिंता वाटणे स्वाभाविकच आहे, पण त्याचबरोबर सामान्य जनतेला जो दिलासा मिळणार आहे त्याचा आनंद संबंधित राज्य सरकारांनी मानला पाहिजे. आतापर्यंत हॉटेलचे भाडे २०० ते ३०० रुपये असले तरी त्यावर १२% कर होता आता तो पाच टक्क्यांवर आलेला आहे. साध्या कपड्यांवर सुद्धा मोठ्या प्रमाणावर जीएसटीचा दबाव होता त्यातही कपात होणार आहे. आजकाल चांगली पादत्राणे दीड हजार ते दोन हजार रुपयांच्या खाली मिळत नाहीत. त्या ठिकाणी हजार रुपयांच्या वर किंमत असली रे असली की त्या पादत्राणे आणि वहाणांवर १२% जीएसटी लागू व्हायचा. मात्र आता तोच जीएसटी पाच टक्क्यांवर आणण्यात आलेला आहे. तसेच बऱ्याच महागड्या वस्तू २८% जीएसटीच्या स्लॅबमध्ये होत्या त्यापैकी कार, बाईक, थ्री व्हीलर, एसी, फ्रिज, तसेच सिमेंट आणि ३५० सीसीच्या बाईक्स आणि त्यांचे स्पेअर पार्टस हे सरळ सरळ २८ टक्क्यांवरून १८% वर आणलेले आहेत. परंतु यामध्ये मेख अशी आहे की ज्या अतिशय महागड्या आणि अत्यंत चैनीच्या वस्तू किंवा गाड्या आहेत. त्यावर आता ४०% जीएसटीचा कर आकारण्यात येणार आहे. उदाहरणार्थ जो माणूस दोन-तीन कोटींची गाडी घेणार आहे त्याला ४०% कर भरावा लागेल. केंद्र सरकारने केलेल्या सूचनेनुसार जीएसटी परिषदेने अनेक वस्तू शून्य करावर आणलेल्या आहेत, त्यामध्ये मध्यमवर्गीयांसाठी महत्त्वाच्या तसेच खाण्यापिण्याच्या आणि शालोपयोगी वापराच्या नित्योपयोगी गोष्टी जास्त आहेत. जसे दूध, पनीर, पिज्झा, ब्रेड, रोटी, पराठा या अन्नपदार्थांवरती आता कर लागणार नाही. तसेच शालोपयोगी गोष्टींमध्ये पेन्सिल, कटर, खोडरबर, लिखाणाच्या वह्या या वस्तूही स्वस्त होणार आहेत. विशेष म्हणजे औषधां वरील ३३% कर कमी केलेला आहे. त्यामध्ये शाम्पू, साबण, तेल या दैनंदिन वापरातील वस्तू पाच टक्के जीएसटीच्या कक्षेत आणल्या गेलेल्या आहेत. नमकीन पदार्थ, पास्ता, कॉफी नूडल्स यांच्यावरचा जीएसटी पाच टक्के करण्यात आला आहे. थर्मामीटर, ग्लुकोमीटर यांच्यावरचा जीएसटी १८ टक्क्यावरून पाच टक्के करण्यात आला आहे. सगळ्याच वस्तूंची जंत्री या ठिकाणी मांडू शकत नाही. परंतु सरकारने सामान्य आणि मध्यमवर्गीयांचा विचार केलेला दिसते आहे. तरीही सगळ्यात मोठा प्रश्न म्हणजे सरकारला अचानक एवढी सामान्य जनतेची कणव कशी काय बरे आली, हा प्रश्न खरे तर कोणीच विचारू नये. कारण सध्याची आपल्या देशाची परिस्थिती पहा आणि सामान्य जनतेच्या पायावर फुले वाहा, असा राष्ट्रीय कार्यक्रम ठरलेला असतो. भारतीय स्वातंत्र्याची दुंदुभी १५ ऑगस्ट १९४७ साली रात्री बारा वाजता वाजली होती. तशीच याबाबत निर्णयासाठीची घोषणा करताना विशेष अधिवेशन भरवून त्याच रात्री बारा वाजता ही घोषणा करण्यात आली आहे. सर्व देशभर समान कर असावा या उद्देशाने सुरू असलेला जीएसटीचा हा सोपस्कार पुढील कालावधीमध्ये जनोपयोगी ठरो आणि हो, अगदी तसाच सर्व राज्यांना सुखाचा ठरो, अशी अपेक्षा आपण करूया!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# गरजा स्वस्त, शौक महाग!

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ४ :**
पंतप्रधान मोदींनी १५ ऑगस्टच्या भाषणात सांगितलेल्या दिवाळी भेटीला जीएसटी कौन्सिलने मान्यता दिली आहे. आता जीएसटीमध्ये ५% आणि १८% असे फक्त दोनच स्लॅब असतील. नवीन बदलांमुळे, दूध-तूप, टीव्ही-एसी, कार-बाईक, विमा यासारख्या ५ प्रकारच्या गरजेच्या वस्तू स्वस्त होतील. तथापि, छंद आणि चैनीसाठी ४०% चा आणखी एक स्लॅब असेल.

बुधवार ३ सप्टेंबर रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या जीएसटी कौन्सिलच्या ५६ व्या बैठकीत अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी जीएसटीचे ५%, १२%, १८% आणि २८% असे ४ स्लॅब कमी करून २ केले. म्हणजेच आता ५% आणि १८% असे दोन स्लॅब असतील.

साबण, शाम्पू, एसी, कार यासारख्या सामान्य गरजेच्या वस्तू देखील स्वस्त होतील. दूध, रोटी, पिज्झा ब्रेड, यासह अनेक अन्नपदार्थ जीएसटीमुक्त असतील. वैयक्तिक आरोग्य आणि जीवन विम्यावर कोणताही कर लागणार नाही. ३३ जीवनरक्षक औषधे, दुर्मिळ आजारांसाठीची औषधे आणि गंभीर आजारांसाठीची औषधे देखील करमुक्त असतील. लक्झरी वस्तूंवर आता २८% ऐवजी ४०% जीएसटी आकारला जाईल. मध्यम आणि मोठ्या कार, ३५० सीसीपेक्षा जास्त इंजिन च्या मोटारसायकली या स्लॅबमध्ये येतील.

या बदलांचा उद्देश सामान्य माणसाला दिलासा देणे, लहान व्यवसायांना आधार देणे आणि तंबाखूसारख्या हानिकारक उत्पादनांवर कर वाढवून त्यांचा वापर कमी करणे आहे.

जीएसटी २.० चे उद्दिष्ट कर संरचना सुलभ करणे, सामान्य लोकांवरील कराचा भार कमी करणे आणि लघु उद्योगांना प्रोत्साहन देणे आहे. याशिवाय, उलटी शुल्क रचना दुरुस्त करणे आहे.

जीएसटी कौन्सिलची ५६ वी बैठक अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली येथे झाली.

जीएसटीमध्ये कपात केल्यामुळे, ५ श्रेणीतील वस्तू स्वस्त होतील. बहुतेक किराणा मालावरील कर १२% वरून ५% पर्यंत कमी करण्यात आला आहे. याशिवाय, इलेक्ट्रॉनिक्सवरील जीएसटी २८% वरून १८% करण्यात आला आहे. आरोग्य विमा किंवा १०,००० रुपयांच्या प्रीमियमसह टर्म इन्शुरन्सवर १८०० रुपयांची थेट बचत होईल, कारण त्यावरील १८% कर शून्य करण्यात आला आहे. एसीवरील जीएसटी दर २८% वरून १८% पर्यंत कमी करण्यात आले आहेत. ३२ इंचापेक्षा मोठा टीव्हीवरही जीएसटी दर कमी करण्यात आले आहेत. सरकारने सिमेंट आणि इतर बांधकाम साहित्यांवरील जीएसटी कमी केला आहे.

दुसरीकडे, छंद आणि चैनीच्या वस्तूंसाठी ४०% चा नवीन स्लॅब तयार करण्यात आला आहे. त्यामुळे, सर्वसामान्य लोकांच्या गरजा स्वस्त होणार असून, चैन मात्र महागणार आहे.

जीएसटीमध्ये यापुढे फक्त दोनच स्लॅब : कौन्सिलने दिली मान्यता




तंबाखूजन्य पदार्थ, दारू व चैनीच्या वस्तू महागणार



# सोलर एक्सप्लोसिव कंपनीत भीषण स्फोट

## १ ठार, २४ जखमी, ४ गंभीर



■ **स्वप्निल राऊत**
**बाजारगाव /काटोल/ नागपूर, दि. ४:**
नागपूर जिल्ह्यातील बाजारगाव येथील सोलर एक्सप्लोसिव्ह कंपनीत बुधवारी मध्यरात्री भीषण स्फोट झाला. कंपनीच्या एचएमएक्स व आरडीएक्स विभागात झालेल्या या स्फोटाने संपूर्ण परिसर हादरून गेला. या दुर्घटनेत एका कामगाराचा मृत्यू झाला असून २४ जण जखमी झाले आहेत. त्यापैकी चौघांची प्रकृती चिंताजनक आहे.


मृतक मयूर गणवीर

रात्री साधारण अडीच वाजता प्लांटमधून धूर उठताना दिसला. त्वरित सुरक्षा पथकाने सायरन वाजवून इशारा दिला व कामगारांना बाहेर काढण्यास सुरुवात केली. बहुतेक कामगार सुरक्षित बाहेर आले. दरम्यान आरएनडी लॅबमध्ये कार्यरत मयूर गणवीर बाहेर पडत असतानाच प्रचंड स्फोट झाला. स्फोटातून उडालेल्या मोठ्या दगडांच्या तडाख्यात ते जागीच ठार झाले.

**दहा किमीवर आवाज, इमारत कोसळली**

स्फोटाचा आवाज तब्बल दहा किलोमीटरपर्यंत ऐकू आला. स्फोट इतका भीषण होता की संपूर्ण इमारत कोसळली आणि मलबा थेट राष्ट्रीय महामार्गावर पडला. कंपनी परिसरातील एचआर ऑफिस, सिक्युरिटी ऑफिस तसेच मुख्य इमारतीचे मोठे नुकसान झाले. परिसरात उभी असलेली बसही हादरली.

**अफरातफरी, गावकऱ्यांची गर्दी**

स्फोटानंतर कंपनीत प्रचंड गोंधळ उडाला. आसपासच्या गावांतील नागरिक मोठ्या संख्येने कंपनीच्या प्रवेशद्वारावर जमले व आपल्या नातेवाईकांचा शोध घेऊ लागले.

घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी डॉ. विपीन, पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार, उपविभागीय अधिकारी पियूष चिवंडे, तहसीलदार राजू रणवीर व एसडीपीओ बापूसाहेब रोहोम तसेच स्फोटक, पर्यावरण, कामगार आणि सेफ्टी विभागाचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले.

गंभीर जखमींना कंपनीने ठरवलेल्या खासगी रुग्णालयात व नागपूर शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. काहींवर कोंढाळी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी रात्रीच घटनास्थळ गाठले. मात्र सुरक्षा कारणाने घटनास्थळी जाता आले नाही.

आज सकाळी अनिल देशमुख पुन्हा घटनास्थळी पोहचले, मात्र, त्यांना अडवले गेले. नंतर अनिल देशमुख यांनी दंदे हास्पिटलला पोहोचले व जखमींची विचारपूस केली.

माजी राज्य मंत्री बच्चूभाऊ कडू यांच्यासह विविध जनप्रतिनिधी व सामाजिक संघटनांचे पदाधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केली तसेच जखमींची भेट घेत विचारपूस देखील केली.

**दोन कामगारांना पाय गमवावे लागले**

मलब्याचा मोठा भाग कंपनीच्या कबाड विभागावर कोसळला. यात कैलाश वर्मा आणि मनीष वर्मा गंभीर जखमी झाले. लोखंडी पत्रा पडल्याने त्यांचे दोन्ही पाय चिरडले गेले आणि अखेरीस त्यांना पाय गमवावे लागले.

**उपद्रवी कडून तोडफोड**

घटनेनंतर कंपनी चे सुरक्षा रक्षक जखमीं उपचारासाठी नेण्यात मदतीला होते तर याच दरम्यान जवळच्या गावांतील काही उपद्रवींनी कंपनी परिसरात घुसून तोडफोड केली. यात कामगारांच्या बसेसची काच फोडली. सिक्युरिटी ऑफिसमध्ये घुसून संगणक व इतर साहित्याची मोडतोड केली.

**सोलार प्लेट्सही फुटल्या**

सोलर एक्सप्लोसिव्ह इंडस्ट्रीज लिमिटेडने परिसरात बसवलेल्या सोलार विद्युत पॅनेल्सचेसुद्धा मोठे नुकसान झाले.

*या स्फोटात निकेश इरपाची (नांदुरा), हिमांशू पंचाभाई (नागपूर), सिद्धार्थ डोंगरे (रिधोरा), प्रभात मिश्रा (सावंगा), रविंद्र मिश्रा, रोशन फरकाडे (कोंढाळी), सचिन सरोदे (पांजरा), योगेंद्र सिंह (बिहार), सनी कुमार (कछनूर), सुरेश दोसेवार (काटोल), अरुण कुमार (कचनूर), सुरज बिटने (कोंढाळी), देविचंद लोखंडे (दुधाळा), चंद्रेश भारती (भोपाल), सुरज कुमार मित्तल (बिहार), बादल मानकापूरे (कछनूर), प्रतीक तिवारी (कचनूर), नीरज कुमार (कचनूर), आशीष तूमडाम, सनी कुसूम, प्रेमसिंग (रीवा, म.प्र.), रोहित चुंगलकर (नागपूर) असे एकूण २४ जण जखमी झालेत. यातील सुरज कुमार, निकेश इरपाची, प्रभात मिश्रा आणि योगेंद्र सिंह या चार जणांना आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले असून, दोघांची प्रकृती चिंताजनक आहे.*

# सरसकटचा जीआर नाही

## खरे कुणबी असतील त्यांना आरक्षण मिळेल : मुख्यमंत्र्यांची स्पष्टोक्ती

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ४ :**
मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर सरकारने काढलेल्या जीआरविषयी वेगवेगळे मतमतांतरे व्यक्त केली जात असताना आता स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा जीआर मराठा समाजाला आरक्षणाचा सरसकटचा लाभ देणारा नसल्याचे स्पष्ट केले आहे.



सरकारने मराठा आरक्षणाविषयी काढलेला जीआर सरसकटचा नाही. या प्रकरणी जे खरे कुणबी असतील त्यांनाच आरक्षणाचा लाभ मिळेल. या प्रकरणी कुणालाही खोटेपणा करता येणार नाही, असे ते म्हणालेत.

मुख्यमंत्री या मुद्यावर भाष्य करताना म्हणाले, छगन भुजबळ हे मंत्रिमंडळातून कुठेही निघून गेले नाहीत. त्यांची व माझी चर्चा झाली. मी त्यांना आश्वस्त केले आहे की, सरकारच्या जीआरमुळे ओबीसी समाजाला कोणताही धक्का बसणार नाही.

हा सरसकट जीआर नाही. हा पुराव्याचाच जीआर आहे. मराठवाड्यातील पुरावे हे निजामाच्या म्हणजे हैदराबाद गॅझियटमध्ये मिळतात. त्यामुळे तेथील पुरावे आपण ग्राह्य धरले. त्यामुळे जे खरे कुणबी असतील त्यांनाच हे आरक्षण मिळेल. मंत्री भुजबळांच्या मनातील गैरसमज दूर करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## कितीही उपसमित्या बनवा आरक्षण मिळवणारच!

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ४ :**
मनोज जरांगे यांनी ओबीसी समाजासाठी सरकारने स्थापन केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीचे स्वागत केले आहे. असे असले, तरी मराठ्यांना ओबीसीमध्ये समाविष्ट करून आरक्षण मिळवून देण्याची जबाबदारी आपलीच असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.



कोणी कितीही उपसमित्या केल्या, तरी मराठ्यांना आरक्षण मीच मिळवून देणार,' असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला. जरांगे म्हणाले, गोरगरीब ओबीसींचे काम होणार असेल, तरी ही चांगली गोष्ट आहे. त्यावर आमची काही हरकत नाही.

## संजय शिरसाटांच्या अडचणीत वाढ

### जमीन घोटाळ्याची सुप्रिम कोर्टाच्या समितीकडून दखल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :**
सरकारमधील कथित गँग्स ऑफ गद्दारच्या सिडको जमीन घोटाळ्याची सुप्रीम कोर्टाच्या उच्चाधिकार समितीने गंभीर दखल घेतल्याचा दावा आमदार रोहित पवार यांनी केला आहे. झोपलेल्या सरकारला आता तरी जाग येईल का? असे ते म्हणालेत.



संजय शिरसाट यांनी सिडकोचे अध्यक्षपद मिळताच सारे नियम धाब्यावर बसवून बिवलकर कुटुंबाला नवी मुंबईत १५ एकर जमीन दिली. हा ५ हजार कोटींचा भ्रष्टाचार आहे, असा आरोप करीत सखोल चौकशी करावी, अशी मागणी पवार यांनी केली होती. सर्वोच्च रोहित पवार यांनी केला होता. न्यायालयाद्वारे स्थापित उच्चाधिकार समितीने मात्र या प्रकरणाची गंभीर दखल घेतली, असे रोहित पवार यांनी सांगितले आहे.

## दोन वर्षात पाचवा स्फोट

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :**
अमरावती मार्गावर असलेल्या आणि स्फोटकांची निर्मिती करणाऱ्या विविध कंपन्यांमध्ये गेल्या दोन वर्षांत पाच भीषण स्फोट झाले आहेत.

चामुंडा एक्सप्लोसिव्ह, एशियन फटाका कंपनी, एसबीएल आणि सोलर इंडस्ट्रीज या कारखान्यांमध्ये झालेल्या अपघातांत आतापर्यंत २१ जणांचा मृत्यू झाला असून २५ हून अधिक जखमी झाले आहेत. सुरक्षेच्या पुरेशा उपाययोजनांचा अभाव हे स्फोटाचे मुख्य कारण आहे.

## नवी दिल्लीसह तीन राज्यात हाहाकार



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ४ :**
देशातील जवळजवळ अर्ध्या भागात मान्सूनचा पाऊस, पूर किंवा भूस्खलन होत आहे. गंगा आणि यमुनेसह सर्व लहान-मोठ्या नद्या दुथडी भरून वाहत आहेत. दिल्ली-एनसीआरमध्ये यमुनेचे पाणी रस्ते आणि घरांपर्यंत पोहोचले आहे. मदत छावण्या आणि स्मशानभूमीत पाणी शिरले आहे. पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेशसह अनेक राज्यांमध्ये अशीच परिस्थिती आहे.

## आरक्षणाचा जीआर तकलादू

### ६ कोटी मराठ्यांना फसवल्याचा आरोप

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :**
मराठा आरक्षणाच्या संदर्भात राज्य सरकारने दिलेला जीआर हा अत्यंत तकलादू व फसवणूक करणारा असल्याचा आरोप मनोज जरांगे यांचे निकटवर्तीय ॲड. योगेश केदार यांनी केला आहे. मनोज जरांगे प्रामाणिक असले, तरी त्यांना अपूर्ण माहिती देऊन निर्णय घेण्यास भाग पाडण्यात आल्याचे ते म्हणाले.

ॲड. योगेश केदार म्हणाले की, ६ कोटी मराठा समाजाची जबाबदारी माझ्यावर होती, पण नंतर मला प्रक्रियेपासून दूर ठेवण्यात आलं. मी खोटे बोलू शकलो नाही. जर सरकारला होकार दिला असता, तर पुढच्या पिढ्या मला माफ केल्या नसत्या.

जीआरमध्ये अनेक त्रुटी व क्लिष्ट शब्दप्रयोग आहेत. यामुळे मराठ्यांना कुणबीत समाविष्ट करण्याबाबत कोणतीही ठोस तरतूद नाही. ज्यांच्या नोंदीत आधीच कुणबी शब्द आहे त्यांनाच प्रमाणपत्र मिळेल. नवीन मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात येणार नाही. आम्ही पुन्हा मनोज जरांगे यांच्यासोबत लाखोंच्या संख्येने मुंबईत उतरणार आणि मोठं आंदोलन करणार आहोत, अशी भूमिका केदार यांनी व्यक्त केली.



महासागर

शुक्रवार ५ सप्टेंबर २०२५

यवतमाळ

पान ३

### मुगवानकर शलाका विदर्भ बॅडमिंटन चॅम्पियन

**पुसद** : अमरावती येथील विदर्भस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत शलाका मंगेश मुगवानकर हिने अंडर ११ आणि १३ वर्षे वयोगटातील अंतिम सामन्यात उत्कृष्ट खेळी करत प्रवेश मिळविला. अंडर ११ च्या पारितोषिकावर आपले नाव कोरले असून, ती अंडर ११ मध्ये नवीन चॅम्पियन म्हणून घोषित झाली आहे. ती आपल्या यशाचे श्रेय आपले कोच मंगेश मुगवानकर, सय्यद अर्शद आदींना देते. या यशाबद्दल राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मोहिनी नाईक, कौटकर, नीलेश भंडारी, प्रशांत भंडारी, अजय कोटलवार, नंदू देशमुख, अभिजित बसटवार, ललित जाधव, अमीर हिराणी, ईशान चव्हाण आदींनी कौतुक केले.

# एकाच गावातील कर्जबाजारी ३० शेतकऱ्यांनी केल्या आत्महत्या

**▪ रात्रभर उपाशी झोपून प्रेम जाधवनेही संपविले जीवन ▪ तरीही म्हणते सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशीच... !**



**सार्वजनिक समस्या (भाग ६)**

✍ रघुवीरसिंह चौहान, यवतमाळ ✍


मो.नं. ९४२३४३३२४४

**यवतमाळ, दि.४** : कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ, त्यातच नापिकी, प्रचंड वाढलेला उत्पादन खर्च,आणि त्यातच शेती उत्पादनाला मिळणारे अत्यल्प भाव, मुला मुलींचे लग्न,मुलांच्या शिक्षणासह कुटुंबाचा गाडा चालविताना येणाऱ्या अनंत अडचणी, बँकांचे व खासगी कर्ज इत्यादी प्रकारांनी वैतागलेल्या शेतकऱ्यांना अर्धवट जीवन सोडून व कुटुंबाला वाऱ्यावर सोडून आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलावे लागते. ही समस्त परिस्थिती का ओढवल्या जात आहे ? त्याचे उत्तर आहे बेजबाबदार शासन आणि प्रशासन... कारण, शेती उत्पादनाला पुरेशे भाव न दिल्यामुळे ही परिस्थिती ओढवली जात आहे. सरकार त्याचे आकलन कधीच करीत नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना आपले जीवन संपवावे लागते.

कुटुंबाचा गाडा ओढताना, काढलेल्या बँकांच्या व खाजगी कर्जाची परतफेड करणे शक्य न झाल्याने, शेतकऱ्यांना आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलावे लागते. हे दुर्दैव नाही काय ? तरीही केंद्र आणि राज्य म्हणते आमचे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशीच.... ते कसे पाठीशी आहे हे राज्यकर्त्यांनी जरा समोर येऊन समजावून तरी सांगावे, जेणेकरून शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याची वेळ येणार नाही.

वैतागलेल्या शेतकऱ्यांना आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलावे लागते ते केवळ शेती उत्पादनाला न परवडणारे अत्यल्प भाव, प्रचंड वाढलेला उत्पादन खर्च न निघाल्याने व कर्जबाजारी पणाला कंटाळून, शेती न परवडणाऱ्या एकाच गावातील ३० शेतकऱ्यांनी आपले जीवन संपविले, असे म्हणणे कोणाला खरे वाटणार नाही. परंतु हे सत्य आहे. सन २००९ ते २०२५ ऑगस्ट अखेरपर्यंत शेती तोट्यात आल्याने, एकाच गावातील ३० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. या गावातील शेवटची आत्महत्या मागील आठवड्यात अत्यंत विदारक परिस्थितीत झाली. एवढी भयानक स्थिती असतानाही केंद्र आणि राज्य म्हणते आमचे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, पण, हे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी कसे उभे आहे हे राज्यकर्त्यांनी जरा पुढे येऊन स्पष्टपणे सांगावे, म्हणजे कळेल...!

ज्या एकाच गावातील ३० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या,ते गाव दुसरे तिसरे कोणतेही नसून, यवतमाळ जवळील "बोथबोडण" हे दुर्दैवी गाव होय.... यवतमाळ पासून जवळच्या बोथबोडन या गावातील पहिली आत्महत्या झाली होती सन. २००९ साली. तेथून आत्महत्यांचे या गावातील सत्र सुरू झाले. त्यात हरी जाधव, विनोद बाळू राठोड, तारासिंग राठोड, रामचंद्र बापूराव देवकर, शंकर सूर्यभान वाघमारे, राजू डोमा पवार, हाजू गरदल चव्हाण, संजय केशव राठोड, खुशाल राठोड, नारायण शेळके, जंगलू शेळके, वसराम राठोड, एकनाथ फुपरे, विलास वरणकर, चरण दगडू राठोड, नंदा दुलाजी राठोड, सिताराम धुराजी धुमले, रमेश नंदा राठोड, बेबी महादेव धुर्वे, पार्वती राठोड, सुंदरी चिंतामण चव्हाण, धुमडी विनायक जाधव, विलास तेजस राठोड, रामराव मुंगशी चव्हाण, चरण जाधव, सरदार देविदास चव्हाण, देवराव शंकर राठोड, कवडू गणपत पवार, आणि मागील आठवड्यात ज्या शेतकऱ्याने आत्महत्या केली त्याचे नाव आहे प्रेम हरी जाधव, अशा एकाच गावातील ३० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.यात आताची म्हणजेच शेवटची आत्महत्या ज्याने केली, त्या प्रेम हरि जाधवकडे पावणेतीन एकर स्वतःची शेती असून, अन्य शेतकऱ्यांच्या शेती बटयी व मक्तेदारीने वहीत करून आपल्या कुटुंबाचा गाडा कसाबसा चालवीत होता. पण, त्याची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट होती. समोर मुला मुलींचे लग्न, मुला-मुलींचे अर्धवट राहिलेले शिक्षण, त्यातच कुटुंबाचा गाडा ओढणे आणि बँकांचे दोन लाख रुपये कर्ज, खाजगी सावकारांचे एक लाखाचे कर्ज.. त्याची परतफड करने शक्य न झाल्याने शेवटी त्याच्या डोक्यात आत्महत्येचा विचार घुटमळला, आणि ज्या दिवशी प्रेम जाधव ने आत्महत्या केली, त्याच्या आदल्यादिवशी तो रात्रभर उपास पोटी झोपला होता.कारण, घरात अन्न नाही, पैसा नाही, करणार काय ? आणि शेवटी रात्रभर उपाशी राहिल्यानंतर दुसऱ्या दिवशी प्रेम जाधवने सकाळी कीटकनाशक औषध प्राप्त करून ते गटागट गिळले आणि स्वतःचे जीवन संपविले... कुटुंबाची दयनीय आणि आर्थिक अवस्था न बघवल्याने प्रेम हरि जाधव या शेतकऱ्याने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या तर केली. पण, त्याच्या पश्चात पत्नी दोन मुले, दोन मुली व आप्तपरिवार आहे. त्यांचे पुढे काय होणार ? हा प्रश्न सर्वसामान्यांच्या समोर उभा ठाकला असून, बोथबोडन या गावात सर्वत्र चिंता व्यक्त होत आहे. जर अशीच परिस्थिती कायम राहिली आणि शेतकऱ्यांच्या उत्पादनाला भाव मिळाला नाही तर शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र थांबणार नाहीच... सरकार आणखी किती लोकांचे जीवन संपविणारा आहे हे तरी एकदाचे सरकारने जाहीर करून टाकावे, म्हणजे बोथबोडणच्या शेतकऱ्यांना सामूहिक आत्महत्येचा निर्णय तरी घेता येईल ? ज्या प्रेम जाधवने मागील आठवड्यात आपले जीवन संपविले त्याचे वडील हरी जाधव यांनी सुद्धा सन २००९ मध्ये नापिकी आणि कर्जबाजारीपणालाच कंटाळून आत्महत्या केली होती. आणि जवळपास अशाच विदारक परिस्थितीला कंटाळून बोथबोडनच्या ३० शेतकऱ्यांनी आतापर्यंत आपले जीवन संपविले आहे. सरकार याबाबतीत काही ठोस निर्णय घेईल काय ? असा प्रश्न विचारल्यास वावगे ठरणार नाही.



मृतक प्रेम हरी जाधव बोथबोडन

## मराठ्यांच्या आरक्षणासंदर्भातील निघालेला आदेश तात्काळ रद्द करण्याची मागणी

**▪ ओबीसी समाज संघटनेने दिले निवेदन**



**यवतमाळ, दि.४, महासागर प्रतिनिधी**: ओबीसीं समाज संघटनेच्या वतीने आज पालकमंत्री व जिल्हाधिकारी यवतमाळ यांना ओबीसी आरक्षण बचावच्या मागणीसाठी महिला- पुरुष व बालकांसहित जाऊन निवेदन देण्यात आले. दिनांक २ सप्टेंबर रोजी सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासनाकडून शासन निर्णय जारी करण्यात आला आहे या निर्णयानुसार मराठा समाजातील काही व्यक्तींना मराठा कुणबी समाजाशी जोडून ओबीसी प्रमाणपत्र मिळवून देण्याचा मार्ग मोकळा करण्यात आलेला आहे. हा शासन निर्णय पूर्णपणे अन्यायकारक व बेकायदेशीर व असंविधानिक आहे. या निर्णयामुळे ओबीसी समाजातील सुमारे ४०० जातींच्या हक्कांवर गदा येऊन त्यांना शिक्षण व नोकरीच्या क्षेत्रात होणारे प्रतिनिधित्व गंभीर स्वरूपात घटना आहेत, यासाठी हरकती घेण्यात आलेल्या आहेत १) घटनांचे उल्लंघन आरक्षणे फक्त सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीयांना देण्यात येते मराठा समाजाचा समावेश हा या तत्त्वांचा भंग आहे.

२) आधीच मर्यादित संधी असलेल्या ओबीसी समाजातील घटकांना आणखी मागे ढकलले जाईल ३) सर्वोच्च न्यायालयातील निर्णयांचे उल्लंघन सर्वोच्च न्यायालय विधि आयोगाने स्पष्ट केले आहे की केवळ राजकीय दबावाखाली जातीचा समावेश आरक्षणात करता येत नाही. २ सप्टेंबर २०२५ रोजी घेतलेला शासन निर्णय तात्काळ मागे घ्यावा अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी महात्मा फुले समता परिषद जिल्हाध्यक्ष विनोद इंगळे महिला जिल्हाध्यक्ष सुनयना येवतकर (अजात) नीलिमा पाटणकर मायाताई गोबरे, शितल घावडे, सुषमा बर्डे, कविता पांढरकर, वर्षा लोखंडे,योगिता कठाळे, सविता हजारे, ज्ञानेश्वर गोबरे, विलास काळे, अविनाश घाटे, गजानन बीहीरमकार, विजय पाटणकर,गजानन राऊत, प्रथमेश बत्तलवार, प्रवीण गावडे, गोविंद चव्हाण, अभिषेक निवास, पायल घाटे, अशोक मोहुर्ले,विद्या गाथरवार, मनोज भबुतकर, करुणा भबुतकर, संध्या लोणारकर, दिपाली चौधरी, नंदरज ठाकरे, जानराव राठोड ,दीपक वाघ ,निर्मिक वाघ उपस्थित होते.

## पांढरकवड्यात जुगार अड्ड्यावर धाड; लाखांचा मुद्देमाल जप्त

**पांढरकवडा, दि.४, महासागर प्रतिनिधी**: येथील आखाडा रोडवरील शिव गणेश मंडळालागत खुल्या टिनशेडमध्ये सुरू असलेल्या अवैध जुगार अड्ड्यावर पोलीसांनी धाड टाकून कारवाई केली. ही कारवाई दिनांक ३ सप्टेंबर रोजी सायंकाळ दरम्यान करण्यात आली. यामध्ये एकूण २ लाख ८६ हजार ६३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पाच आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबिन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या धाडीत काही आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाले, तर पियुष पोलाडीवार वय ३७,आशिष गॅनचंदानी वय ३५, विनोद पिपंळे वय २८, अभिषेक मडावी वय १८, यांना घटनास्थळी अटक करण्यात आली. चौकशीत संघर्ष बंडू बाभुळकर याचेही नंव समोर आले आहे.

## सिमेंट बंधाऱ्याचे निकृष्ट; बेड, कॉँक्रीट गेले वाहून

**पांढरकवडा, दि.४, महासागर प्रतिनिधी**: रुढा येथील कोलाम पोडाजवळ नुकतेच मृद व जलसंधारण विभागाच्या माध्यमातून लाखो रुपयांच्या खर्चाने सिमेंट बंधाऱ्याचे काम करण्यात आले. मात्र अवघ्या काही महिन्यांतच या बंधाऱ्याचे बेड कॉँक्रीट पावसाच्या प्रवाहात वाहून गेले आहे.



## बसस्थानकावरच लालपरीचा ब्रेक डाऊन

**पाटणबोरी, दि.४, महासागर प्रतिनिधी**: पांढरकवडा आगारात नव्यानेच दाखल झालेल्या लालपरीचा पाटणबोरी बसस्थानकावरच ब्रेक डाऊन झाल्याने बस चालकांना बस फिरविताना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे MH ११ T ९२९५ह्या क्रमांकाची बस दुपारी १२च्या दरम्यान बस स्थानकावर आल्या नंतर बस वळवीत असताना बस मध्ये तांत्रिक दोष निर्माण होऊन बस स्थानकाच्या मद्य भागीच बस थामली. ना समोर ना मागे जाऊ शकत नसल्याने बसचा मुक्काम जागेवरच होतो. इतर येणाऱ्या बसेसना शेवटी शेजारी असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या पटांगनातून बस फिरवाव्या लागल्या.



## पंधरा दिवसांत दुसऱ्यांदा शिवणी गावात पाणी शिरले



**मारेगाव, दि.४, महासागर प्रतिनिधी**: तालुक्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या शिवणी गावाला बेंबळा प्रकल्पाच्या चुकीच्या कामाचा मोठा फटका बसत आहे. अवघ्या पंधरा दिवसांत दुसऱ्यांदा गावात पाण्याचा शिरकाव झाला असून घरं, शेतशिवार पाण्याखाली गेल्याने नागरिक व शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. १ सप्टेंबरच्या रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे गावात भीषण परिस्थिती निर्माण झाली. १५ ऑगस्टनंतर पुन्हा एकदा गावात पाणी घुसले. अनेक घरांमध्ये दोन फूटांपर्यंत पाणी साचले होते. यामुळे शिवणीवासीयांनी रात्रभर जागून काढली. तब्बल १५ ते २० घरांमध्ये पाण्याचा शिरकाव झाला. शेतशिवार पाण्याखाली गेल्याने सोयाबीन, कापूस, भाजीपाला यासह इतर पिकांचे मोठे नुकसान झाले. सततच्या पुरामुळे शेतकरी आणि ग्रामस्थ वैतागले आहेत. यावर तातडीने उपाययोजना करण्यात यावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अवघ्या पंधरा दिवसांच्या आत दोनदा गावात पाणी शिरल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. बेंबळा प्रकल्पाचे अपुरे नियोजन आणि प्रशासनाची बेफिकिरी हाच याला कारणीभूत ठरत असल्याचे मत नागरिकांतून व्यक्त होत आहे. बेंबळा प्रकल्पाबरोबरच बांधकाम विभागानेही लक्ष देणे आवश्यक आहे.

## गणपती विसर्जन आणि ईद-ए-मिलादसाठी प्रशासन सज्ज-एसपी चिंता

**▪ गुन्हेगार क्षेत्रातील ५३२ व्यक्ती तडीपार**



**यवतमाळ, दि.४, महासागर प्रतिनिधी**: जिल्ह्यात आगामी सण आणि उत्सव शांततेत पार पडावेत यासाठी पोलीस विभागाने कडक बंदोबस्त तैनात केला आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्ह्यातील ५३२ गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींना तडीपार करण्यात आले असून, संवेदनशील भागात अतिरिक्त पोलीस कुमक वाढवण्यात आल्याची माहिती पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी गुरुवारी (ता.४) आयोजित पत्रकार परिषदेत दिली. ५ सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलाद आणि ६ सप्टेंबर रोजी गणेश विसर्जन कार्यक्रम होणार असल्याने, पोलिसांनी ४८ तास आधीच संपूर्ण जिल्ह्यामध्ये बंदोबस्त तैनात केला आहे. यामध्ये पोलीस शिपाई, उपनिरीक्षक, निरीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस अधीक्षक, अतिरिक्त पोलीस अधीक्षक, तसेच बाहेर जिल्ह्यांतून बोलावण्यात आलेले राज्य राखीव पोलीस दल (SRP) आणि होमगार्ड असे एकूण पाच हजार कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. औद्योगिक परिसरातील चिंतामणी कृषी उत्पन्न बाजार समितीत आयोजित मोरारी बापूंच्या रामकथा सोहळ्यासाठीही पोलिसांकडून विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी येणाऱ्या भाविकांचे दागिने सुरक्षित राहावेत यासाठी विशेष पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या महिलांवरही प्रतिबंधक कारवाई केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

### कब्रस्तान दुरुस्तीसाठी निधीची मागणी

**महागाव**: फुलसावंगी परिसरात झालेल्या ढगफुटीसदृश अतिवृष्टीने प्रचंड नुकसान झाले आहे. नदी-नाल्यांना आलेल्या पुराचा मोठा फटका फुलसावंगी येथील मुस्लीम कब्रस्तानला बसला आहे. कब्रस्तानच्या सुरक्षा भिंतीचा पूर्णपणे विध्वंस झाला असून, मूलभूत सुविधांसह सुमारे ५० लाखाचे नुकसान झाले आहे. कब्रस्तानच्या पुनर्बांधणीसाठी आणि सुविधांच्या पुनर्स्थापनासाठी तातडीने निधी देण्याची मागणी स्थानिक मुस्लीम समाजाने केली आहे. या नुकसानीमुळे कब्रस्तानच्या दैनंदिन व्यवस्थापनावर गंभीर परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर, फुलसावंगी येथील मुस्लीम समाजाने पालकमंत्री संजय राठोड यांना निवेदन सादर केले. सुरक्षा भिंतीच्या पुनर्बांधणीसाठी आणि नष्ट झालेल्या सुविधांच्या पुनर्स्थापनासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आली.

### आरोग्य केंद्रात औषधांचा अपुरा साठा

**यवतमाळ , दि.४, महासागर प्रतिनिधी**: पावसाळ्यात विविध प्रकारच्या साथरोगांमुळे जनसाामन्य नागरिक हैराण झाले आहेत. या परिस्थितीत तत्काळ औषधी मिळावी म्हणून नागरिक आरोग्य केंद्राकडे धाव घेत आहेत. परंतु त्यांना या ठिकाणी हवी असलेली औषधी मिळतच नाही. यातून नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. मुबलक प्रमाणात औषधांचा साठा उपलब्ध करण्याची मागणी नागरिकांकडून झाली आहे.

## मुलाकडून बापाची हत्या

**घाटंजी, दि.४, महासागर प्रतिनिधी**:तालुक्यातील सर्व जातीधर्माचे लोक वास्तव्यास राहणाऱ्या शांतता प्रिय म्हणून ओळख असणाऱ्या येरंडगाव येथे पोटच्या पोरानेच रागाच्या भरात जाऊन फावड्याच्या दांड्याने छातीवर व पोटावर मारून बापाची हत्या केल्याची खळबळ जनक घटना दिनांक २ सप्टेंबर रोज मंगळवारच्या सायं ५ ते ५:३० वाजेदरम्यान घडली. मृतक पुंडलिक दाऊजी कांबळे वय ५५वर्षे यांना दारू पिण्याचे व्यसन होते. त्यामुळे त्यांचा घरात नेहमीच वाद होत होता. त्यातच दिनांक २ सप्टेंबर रोजी मृतक व त्यांचा मुलगा आदर्श पुंडलिक कांबळे वय २५ वर्षे यांच्यात वाद झाला. प्रथमताच स्वभावाने रागीट असलेल्या आदर्शचा राग अनावर झाला. यात त्याने फावड्याचे दांड्याने वडील पुंडलिक कांबळे यांना खाली पाडून पोटावर व छातीवर बेदम मारहाण केली. यात ते बेशुद्ध पडले. हे पाहून आदर्श कांबळे बाहेर पडले. ही बाब पाहून आजारी अवस्थेत असलेल्या मृतकाची पत्नी यांनी गावातीलच काही लोकांना घडलेला प्रकार सांगितला यात काही लोकांनी घटनास्थळावर धाव घेऊन खाजगी वाहणाने घाटंजी रुग्णालयात नेले. मात्र ते मृत पावल्याने त्यांना परत घरी आणले. व दिनांक ३ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता अंत्यसंस्काराची तयारी सुरू केली. ही बाब पारवा पोलिसांना माहीत होताच त्यांनी घटनास्थळ गाठले. आणि मृतकास शवविच्छेदणास घेऊन गेले. अशी फिर्याद शेजारी राहणारे शंकर हसन्रा मोलगुलवार यांनी पारवा पोलीस स्टेशनला लेखी स्वरूपात दिली. यावरून आरोपी आदर्श कांबळे यांचे विरुद्ध विरुद्ध गुन्हा नोंद करून अटक करण्यात आली.

### सततच्या पावसाने शेतीकामे खोळंबली

**यवतमाळ**: गेल्या काही दिवसांपासून या परिसरात सातत्याने पाऊस पडत आहे. परिणामी शेतीची कामे खोळंबली आहे. बुधवारी सकाळपासून पावसाची रिपरिप सुरू होती. दुपारी मात्र पाऊस थांबला.

## मुस्लिम धर्मीय सामूहिक विवाह मेळावा संम्पन्न



**पुसद, दि.४, महासागर प्रतिनिधी**: दिनांक ३ सप्टेंबर रोजी स्थानिक ग्रँड पॅलेस येथे युवक मंडळ वसंत नगर पुसद व्दारा १० नवंदमपत्याच्या विवाह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

पैगंम्बर हजरत मोहम्मद सल्ललाहो यांच्या जयंतीचा महिना आहे या महिन्यात जयंतीच्या दिवशी सामूहिक मीरवणूक काढण्यात येते. खर्च न करता सामूहिक विवाह मेळाव्याचे आयोजन करून एक आदर्श समाजा समोर ठेवण्याचा निर्धार या मेळाव्यातून करण्यात आला.

सदर विवाह मेळाव्यात एकुण १० वधू वाराचा समावेश होता. शहरे काझी सय्यद सद्रद्दीन काझी यांनी नवं दाम्पत्याचा निकाह लावून दिला.

यावेळी अध्यक्षस्थानी डॉ. मोहम्मद नदीम, शरद मैंद,डॉ. अकील मेमन, उपविभागीय अधिकारी आशिष बिजवल,उप विभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बी.जे,हाजी बशारात अली, हाजी परवेज सुरय्या, रफिक माहागाव, अन्वर,इरफान, इर्शाद अली,युनूसभाई माकरांनी, जैनुल सिद्दीकी,ताहेर अली, अबरार खान उपस्थित होते.

लग्न मेळाव्याचे वकील म्हणून काम तहेसीन खान, अमजद खान, सय्यद जाणी, अमजद बिल्डर, यांनी पहिले.

## जिल्ह्यातील ७५ टक्के शेतकरी ई-पीक नोंदणी प्रक्रियेबाहेर

**यवतमाळ, दि.४, महासागर प्रतिनिधी**:राज्य शासनाने पिकांच्या नोंदी ऑनलाईन पद्धतीने करण्याच्या सूचना दिल्या आहेत. यासाठी १५ सप्टेंबरपर्यंतचा कालावधी देण्यात आला आहे. ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी ११ दिवसांचा कालावधी शिल्लक आहे. यानंतरही केवळ २५ टक्के नोंदी पूर्ण झाल्या आहेत. अद्याप ७५ टक्के नोंदी पूर्णतः अपूर्ण आहे. या नोंदीवरच नुकसानभरपाई मिळणार आहे. या संपूर्ण माहितीपासून शेतकरी दूर आहेत.

राज्य शासनाच्या महसूल विभागाने माझी शेती माझा सातबारा मीच नोंदविणार पिकांचा पेरा ही मोहीम हाती घेतली आहे. यातून शेतकऱ्यांना आपल्या सातबाऱ्यावर स्वतःच पिकाच्या नोंदी करायच्या आहेत. ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणाऱ्या ह्या नोंदी शेतकऱ्यांना बंधनकारक करण्यात आल्या आहे. यासाठी शेतकऱ्यांना मोबाईल ॲपवरून ह्या नोंदी घ्याव्या लागणार आहेत.

प्रारंभी तांत्रिक अडचणीमुळे शेतकऱ्यांना ॲपवर पीक पेऱ्याची नोंदच करता आली नाही. यामुळे शेतकऱ्यांच्या ई-पीक नोंदणीचे प्रमाण कमी झाले आहे. काही ठिकाणी शेत शिवारात रेंजच मिळत नाही. यातून शेतकरी चांगलेच वैतागले आहेत. यामुळे इच्छा असतानाही अनेक शेतकऱ्यांना पीक पेऱ्याच्या नोंदीच करता आल्या नाही. आता नुकसान झाल्यास शेत शिवारात मदत मिळविण्यासाठी ई-पीक नोंदणी नसल्यास शेतकऱ्यांना मदतीला मुकावे लागणार आहे. यातून शेतकऱ्यांच्या अडचणी वाढणार आहेत.

# देशभरात ७५ ठिकाणी नमो मॅरेथॉनचे आयोजन : डॉ. मनसुख मांडविया



**मुंबई :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त १७ सप्टेंबरपासून २ ऑक्टोबरपर्यंत सेवा पंधरवडा देशभरात साजरा करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत युवकांमध्ये क्रीडाप्रेम जागविण्यासाठी व निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी देशभरातील ७५ ठिकाणी नमो मॅरेथॉन आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय युवा कार्य व क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी दिली. या संदर्भात झालेल्या दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत डॉ. मांडविया यांनी राज्यांच्या क्रीडा मंत्र्यांशी संवाद साधला. यावेळी केंद्रीय युवा कार्य व क्रीडा विभागाचे सचिव हरिरंजन राव उपस्थित होते. राज्याचे क्रीडा मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांच्यासह विविध राज्यांचे क्रीडा मंत्रीही उपस्थित होते. मंत्री डॉ. मांडविया म्हणाले की, युवकांचे आरोग्य सक्षम ठेवणे आणि त्यांच्यात राष्ट्रप्रेम जागवणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे या कार्यक्रमांना प्रत्येक राज्याने सक्रिय सहभाग देऊन यशस्वी करावे. तर, यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त ३१ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर : एकतेचा संदेश देणाऱ्या पदयात्रेचे आयोजन देशभर करण्यात येणार आहे.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनी बीड येणार रेल्वेच्या नकाशावर

## बीड ते परळी रेल्वे मार्ग कामाला गती देऊन रेल्वे मार्ग पूर्ण करा : उपमुख्यमंत्री अजित पवार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :** रेल्वेमार्गापासून कोसो दूर असलेले बीड शहर लवकरच रेल्वेच्या नकाशावर येणार आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी बीड ते अहिल्यानगर रेल्वे गाडी सुरू करण्यात येणार असून यामुळे अनेक वर्षापासूनचे बीडवासियांचे रेल्वेसेवेचे स्वप्न पूर्ण होणार आहे. येत्या १७ सप्टेंबर रोजी बीड ते अहिल्यानगर रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत घेण्यात आला. उर्वरित बीड ते परळी वैजनाथ या रेल्वे मार्गातील अडथळे दूर करून गतीने काम पूर्ण करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री पवार यांनी दिल्या. बैठकीला महापारेषण कंपनीचे महाव्यवस्थापक संजीव कुमार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव दशपुते, सचिव



(वित्तीय सुधारणा) शैला ए, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, सहसचिव (परिवहन) राजेंद्र होळकर, रेल्वेचे मुख्य विद्युत अभियंता विनीत कुमार, रेल्वेच्या पुणे विभागाचे अप्पर विभागीय व्यवस्थापक पद्मसिंह जाधव, मुख्य प्रवासी वाहतूक व्यवस्थापक मिलिंद हिरवे, मुख्य जनसंपर्क अधिकारी स्वप्नील नीला, मुख्य अभियंता प्रशांत भेगडे आदी उपस्थित होते. तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी बैठकीत सहभाग घेतला. उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, बीड ते परळी वैजनाथ रेल्वे मार्गाच्या भूसंपादनाचे प्रलंबित प्रकरणे बीड जिल्हा प्रशासनाने तातडीने निकाली काढून आवश्यक जमीन उपलब्ध करून द्यावी. या रेल्वे मागार्साठी राज्य शासनाच्या हिस्स्याची रक्कम तातडीने अदा करण्यात यावी. अर्थसंकल्पात मंजूर १५० कोटी रुपये देण्यात यावे. उर्वरित १५० कोटी रुपयांची तरतूद करावी. रेल्वेने आतापर्यंत दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करावी. फलटण ते लोणंद या रेल्वे मार्गावरील प्रलंबित कामे पूर्ण करावीत. बारामती रेल्वे स्थानकाच्या कामाला रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेटी द्याव्या. तसेच कामाला गती देऊन पुढील काळात सुसज्ज रेल्वे स्थानक प्रवाशांच्या सेवेसाठी उपलब्ध करून द्यावे, असे निर्देशही उपमुख्यमंत्री पवार यांनी दिले.

### असा आहे अहिल्यानगर - बीड - परळी रेल्वे मार्ग

रेल्वे मार्गाची एकूण लांबी २६१.२५ किलोमीटर, जमिनीचे एकूण भूसंपादन १८२२.१६८ हेक्टर, रेल्वे खालील एकूण पूल १३०, रेल्वे वरील पूल ६५, मोठ्या पुलांची संख्या ६५, छोटे पूल ३०२. द्वितीय प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाची एकूण किंमत ४८०५.१७ कोटी, प्रकल्पाच्या समप्रमाणात ५०:५० टक्के हिस्सा नुसार केंद्र व राज्य शासनाचा प्रत्येकी हिस्सा २४०२.५९ कोटी.

# भाजपने मनोज जरांगेंना गंडवले

## उपसमिती, शिंदे समिती, मराठे, कुणबी सर्वांचीच फसवणूक; आंबेडकरांचा दावा



**मुंबई :** वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने मनोज जरांगे यांच्यासह सर्वांनाच गंडवल्याचा आरोप केला आहे. महाराष्ट्र शासनाने मराठा समाजाला कुणबी संबोधण्याचा जीआर काढून मोठा गाजावाजा केला. भाजपने असा आव आणला की, न सुटणारा प्रश्न त्यांनी सोडवला. मात्र प्रत्यक्षात हा निर्णय गंडवणारा व फसवणारा आहे, असे ते त्यांनी म्हटले आहे. आंबेडकरांनी याविषयी हायकोर्ट व सुप्रीम कोर्टाच्या विविध निर्णयांचा दाखला दिला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे मराठा आरक्षणाचा प्रश्न खरेच सुटला काय? याविषयी साशंकता निर्माण झाली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत उपोषण केले. त्यांच्या आंदोलनानंतर सरकारने एक जीआर काढला. त्या जीआरद्वारे सरकारने हैदराबाद गॅझेट लागू केल्याची घोषणा केली. या जीआरमुळे मराठवाड्यातील सर्वच मराठा समाजाचे कुणबीमध्ये रुपांतर होऊन त्यांना ओबीसी आरक्षणाचा लाभ मिळेल असा दावा केला जात होता.

# आंदोलनांवर बंदी घालण्याच्या मिलिंद देवरा यांच्या पत्रावरून संताप

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :** राज्यसभेतील खासदार आणि शिंदेंच्या शिवसेनेचे नेते मिलिंद देवरा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून आझाद मैदानासह दक्षिण मुंबईतील ठिकाणी वारंवार होणाऱ्या आंदोलनांवर निर्बंध आणण्याची मागणी केली आहे. या पत्रात त्यांनी आंदोलनांचे ठिकाण दक्षिण मुंबईऐवजी इतरत्र हलवण्याची सूचना केली आहे.

देवरांनी म्हटले आहे की, दक्षिण मुंबई हे राज्याच्या शासन, सुरक्षा आणि अर्थकारणाचे केंद्र असून, येथे मुख्यमंत्री सचिवालय (मंत्रालय), विधीमंडळ, मुंबई महानगरपालिका मुख्यालय, पोलिस दलाची कार्यालये तसेच वेस्टर्न नेव्हल कमांड यांसारख्या महत्वाच्या संस्था आहेत. त्यामुळे येथे होणाऱ्या मोठ्या आंदोलनांमुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनात व्यत्यय येतो आणि शासन, सुरक्षा तसेच खासगी क्षेत्राच्या कामकाजावर परिणाम होतो. म्हणूनच अशा आंदोलनांना इतर ठिकाणी हलवण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी पत्रातून स्पष्ट केले आहे. तथापि, या पत्रावरून मराठी एकीकरण समितीचे प्रमुख दीपक पवार यांनी तीव्र प्रतिक्रिया नोंदवली आहे. त्यांनी म्हटले आहे, बाप बदलला की विचार बदलतात असं नाही. हा आणि याचा सख्खा बाप यांचे विचार इतकेच मराठीद्वेष्टे होते. मिलिंद देवरा यांच्या पत्राची दक्षिण मुंबईतच होळी झाली पाहिजे.

देवरांच्या पत्रामुळे मराठी समाजात संतापाची लाट उसळली असून, आंदोलने हा लोकशाही हक्क असून त्यावर कुठल्याही प्रकारचे निर्बंध घालणे योग्य ठरणार नाही, असे मराठी संघटनांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस काय निर्णय घेतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कारखाने अधिनियमातील दुरुस्तीला मंत्रिमंडळाची मान्यता

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :** राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत कारखाने अधिनियम, १९४८ मधील काही तरतुदींमध्ये महत्त्वपूर्ण दुरुस्ती करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे कामगार आणि उद्योग क्षेत्रातील नियम सुलभ होऊन पारदर्शकता वाढणार असल्याची माहिती कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिली. याबाबत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले.

### कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांची माहिती



या दुरुस्ती अंतर्गत कलम ५४ मध्ये कामगारांच्या कामकाजाच्या वेळेबाबत आता दिवसाला ९ तासांऐवजी १२ तास काम करण्याची तरतूद करण्यात आली आहे. कलम ५५ मध्ये विश्रांती कालावधीमध्ये बदल करून ५ तासांनंतर ३० मिनिटे आणि ६ तासांनंतर पुन्हा ३० मिनिटे विश्रांतीची तरतूद करण्यात आली आहे. यातील कलम ५६ मध्ये आठवड्याचे कामकाजाचे तास ४८ तासांवरून ६० तासांपर्यंत वाढविण्यात आले आहेत. तसेच कलम ६५ मध्ये कामगारांच्या अतिरिक्त वेळेबाबत आता कमाल मर्यादा ११५ तासांवरून १४४ तासांपर्यंत वाढविण्यात आली आहे. यामुळे कामगारांना अधिकचा आर्थिक लाभ मिळणार आहे. तसेच शासन मान्यतेशिवाय असा वेळेतील बदल कारखान्यांना परस्पर करता येणार नाही. त्याचबरोबर, आठवड्यात ४८ तास काम ही कालमर्यादा ओलांडता येणार नसल्याचेही कामगार मंत्री ॲड. फुंडकर यांनी सांगितले आहे. कामगार मंत्री ॲड.फुंडकर यांनी सांगितले की, कामगारांकडून जास्तीचे काम घेतल्यास त्याचा पुरेपूर मोबदला आणि पगारी सुट्या देण्यासबंधीचे बदल यात सुचविण्यात आले आहेत. केंद्र शासनाच्या धोरणा अंतर्गत देशात होणारे बदल लक्षात घेता कायद्यातील हे बदल उद्योग आणि कामगार या दोन्ही घटकांसाठी महत्वाचे आहेत. उद्योग क्षेत्राला लवचिकता मिळेल तर कामगारांसाठीही पारदर्शक आणि नियोजित कामकाजाचे वातावरण उपलब्ध होणार आहे.

# मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यात सार्वजनिक सुट्टी ५ सप्टेंबर ऐवजी ८ सप्टेंबरला

**मुंबई :** मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यात ईद-ए-मिलाद निमित्त सार्वजनिक सुट्टी यापूर्वी ५ सप्टेंबरला जाहीर करण्यात आली होती. आता ही सुट्टी शुक्रवार दि. ५ सप्टेंबर ऐवजी सोमवार दि. ८ सप्टेंबरला असणार आहे. मुंबई शहर व उपनगर जिल्ह्याव्यतिरिक्त इतर जिल्ह्यांसाठी शुक्रवार दि. ५ सप्टेंबर ही सार्वजनिक सुट्टीची तारीख कायम ठेवण्यात येत आहे. राज्यात बंधुता आणि एकता टिकावी या हेतूने मुस्लीम समाजाने ईद-ए-मिलाद निमित्त काढला जाणारा जुलूस कार्यक्रम ६ सप्टेंबर ऐवजी ८ सप्टेंबर २०२५ रोजी घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे, मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यातील ५ सप्टेंबर रोजी जाहीर झालेली सार्वजनिक सुट्टी रद्द करून ती ८ सप्टेंबरला जाहीर करण्यात आली आहे. यामुळे मुंबई शहर व उपनगरातील शासकीय कार्यालये ५ सप्टेंबर रोजी नियमित सुरु राहतील, अशी माहिती सामान्य प्रशासन विभागाने परिपत्रकाद्वारे दिली आहे. शनिवार दि ६ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशी हा हिंदूचा सण आहे. राज्यात बंधुता आणि हिंदू - मुस्लिम ऐक्य राखण्यासाठी मुस्लीम समुदायाने जुलूसचा कार्यक्रम ८ सप्टेंबर २०२५ रोजी घेण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी शुक्रवार दि. ५ सप्टेंबर रोजीची सुट्टी आता सोमवार दि. ८ सप्टेंबर रोजी देण्यात येणार आहे.

# भाजप नेते नारायण राणे तातडीने रुग्णालयात दाखल



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :** भाजपचे ज्येष्ठ नेते आणि राज्यसभा खासदार नारायण राणे यांना मुंबईतील जसलोक रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांच्यावर तातडीची शस्त्रक्रिया होणार असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, ही शस्त्रक्रिया नेमकी कशासाठी केली जाणार आहे, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. नारायण राणे यांना अचानक रुग्णालयात दाखल केल्यामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. नारायण राणेंना डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिल्यामुळे त्यांना जसलोक रुग्णालयात दाखल केले.

# सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर जिल्ह्यांना जोडणारा गगनबावडा घाटात दरड कोसळली

■ **महासागर प्रतिनिधी, कोल्हापूर, दि. ४ :** कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांना जोडणारा महत्त्वाचा रस्ता असलेला वैभववाडी तालुक्यातील गगनबावडा घाट दरड कोसळल्याने वाहतुकीसाठी बंद झाला आहे. ही घटना आज, सकाळी ८ वाजता घडली. गेल्या काही दिवसांपासून या भागात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे घाटात मोठी दरड कोसळ्ली.

या दरडीत मोठे दगड असल्याने ते हटवण्याच्या कामात अडचण येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी घटनास्थळी असून ढिगारे बाजूला काढण्याचं काम वेगाने सुरू आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, संध्याकाळी ४ वाजेपर्यंत हा घाट वाहतुकीसाठी पुन्हा खुला होण्याची शक्यता आहे. यामुळे या मार्गावरून प्रवास



करणाऱ्या वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन केले आहे.

# 'पीएसआय' पदांसाठी विभागीय परीक्षा पुन्हा सुरू

## राज्यमंत्री योगेश कदम यांच्या पुढाकाराला यश




**मुंबई:** पोलिस उपनिरीक्षक (पीएसआय) पदांसाठी खातेअंतर्गत विभागीय परीक्षा पुन्हा सुरू करण्याची सूचना गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी एप्रिल २०२५ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे मांडली होती. पूर्वी किमान पाच वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या पोलिस अंमलदारांना पोलिस उपनिरीक्षक पदासाठी २५ टक्के आरक्षणाच्या अंतर्गत विभागीय परीक्षा देता येत होती. या माध्यमातून अनेक पोलिस कर्मचाऱ्यांना अधिकारी होण्याची सुवर्णसंधी मिळत होती. मात्र फेब्रुवारी २०२२ च्या शासन निर्णयानुसार ही परीक्षा बंद करण्यात आली होती. ही परीक्षा पुन्हा सुरू करण्याच्या मागणीचा सातत्याने पाठपुरावा करीत राज्यमंत्री योगेश कदम यांनी मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा केली. याबाबत अधिकृत निर्णय घेण्यात आला आहे. साधारणपणे पोलिस कॉन्स्टेबलना सेवाकालाच्या शेवटच्या टप्प्यात पदोन्नतीद्वारे पीएसआय पद मिळते. अशावेळी त्यांना पीएसआय म्हणून फारतर दोन-तीन वर्षेच काम करता येते. परंतु विभागीय परीक्षेतून पीएसआय झालेल्या अधिकाऱ्यांना कमी वयातच पदोन्नती मिळाल्याने त्यांना पुढील २० ते २५ वर्षे पीएसआय किंवा त्यापेक्षा वरिष्ठ पदांवर कार्य करण्याची संधी मिळू शकते.

# नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना सातव्या हप्त्याचा लाभ वितरित

## शेतकऱ्यांच्या खात्यांवर लवकरच निधी जमा होणार : दत्तात्रय भरणे

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ४ :** नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना सातव्या हप्त्याचा लाभ वितरित करण्यासाठी कृषी विभागातर्फे आज शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा होणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. या योजनेंतर्गत ९२ लाख ३६ हजार शेतकऱ्यांना लाभ होणार असून त्यासाठी एकूण १९३२. ७२ कोटी रुपये निधी मंजुर करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांना प्रति वर्षी सहा हजार रुपये अनुदान देण्यात येते. केंद्र शासनाच्या या अनुदानामध्ये राज्य शासनातर्फे प्रति वर्षी आणखी सहा हजार अनुदान देण्यासाठी नमो शेतकरी महासन्मान निधी योजना राबविली जाते. या दोन्ही



योजनेच्या माध्यमातून लाभार्थी शेतकऱ्यांना प्रति वर्षी बारा हजार अनुदान मिळत असते. राज्याच्या नमो शेतकरी महासन्मना योजनेंतर्गत शेतकरी लाभार्थ्यांना आतापर्यंत एकूण सहा हप्ते देण्यात आले आहेत.

शासन निर्णयानुसार सातव्या हप्त्यामध्ये एप्रिल २०२५ ते जुलै २०२५ या महिन्यांचे अनुदान लाभार्थ्यांना भेटणार आहे. ज्या शेतकरी लाभार्थ्यांचा प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत समावेश आहे. त्या सर्वांना राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा लाभ मिळणार आहे.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, "राज्यातील सर्वसामान्य नागरिक व शेतकऱ्यांना समोर ठेऊन दिलेला प्रत्येक शब्द पूर्ण करण्यासाठी राज्य सरकार काम करीत आहे. राज्यातील शेतकऱ्यांना साथ देण्यासाठी कृषी विभाग सातत्याने काम करीत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली नमो शेतकरी महासन्मान निधी योजना राबविली जाते. या योजनेचा सातवा हप्ता शेतकऱ्यांना लवकरच मिळणार असून अतिवृष्टीमुळे अडचणीत असणाऱ्या शेतकरी बांधवांना या योजनेचा फायदा होणार आहे. तसेच अतिवृष्टीमध्ये बाधित शेती पिकाचे पंचनामे अंतिम टप्प्यात असून इतर कार्यवाही पूर्ण झाल्यावर बाधित शेतकऱ्यांना लवकरच मदत मिळणार आहे.

# पॅरोलवर असलेल्या आरोपीने केली महिलेची हत्या

■ **महासागर प्रतिनिधी, अलिबाग, दि. ४ :** खुनाच्या गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा भोगत असताना पॅरोलवर बाहेर आलेल्या आरोपीने एका महिलेची हत्या केली. ही घटना अलिबाग तालुक्यातील महाजने येथील दिवीवाडी इथं सोमवारी घडली. याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अर्चना चंद्रकांत नाईक असे मृत महिलेचे नाव असून, दत्ताराम नागु पिंगळा असे या आरोपीचे नाव आहे. या दोघांचे प्रेमसंबंध होते. परंतु, अर्चनाच्या काकांचा त्यांच्या प्रेमाला विरोध होता. त्यांनी चंद्रकांत नाईक यांच्यासोबत अर्चनाचे काही वर्षांपूर्वी लग्न लावून दिले होते. या गोष्टीचा राग मनात धरून दत्ताराम नागू पिंगळा याने २८ मार्च २०१८ रोजी तुकराम सजन्या नाईक यांच्या डोक्यावर आणि पाठीमागे धारदार हत्याराने मारहाण करून दुखापत करून त्यांना गंभीर जखमी केलं होतो. तुकाराम सजन्या नाईक यांच्यावर अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु असताना ३१ मार्च २०१८ रोजी त्यांचं निधन झालं. त्यामुळे आरोपी दत्ताराम नागू पिंगळा याला सदर गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा झाली होती.

## सहाव्या दिवशी संपलं नागपूरचं तापलेलं रणांगण

# कोण जिंकले, कोण हरले?

**वार्तापत्र**

**दीपक कैतके, मुंबई**

नागपूरच्या संविधान चौकात गेल्या सहा दिवसांपासून वातावरण तापलेलं होतं. एकीकडे मराठा समाजाच्या आरक्षणासाठी उपोषण तर दुसरीकडे ओबीसी आरक्षण वाचवण्यासाठी महासंघाचा साखळी संघर्ष. दोन्ही बाजूंनी भूमिका ठाम. समाजात तणाव आणि राजकारणात तिढा.

ओबीसी महासंघाने ठाण मांडल्यानंतर सरकारसमोर मोठं आव्हान उभं राहिलं. मागण्या टोकाच्या होत्या, भूमिका कठोर होती. दररोज उकळत जाणारी परिस्थिती अखेर निर्णायक टप्प्यावर पोहोचली. उपोषणकर्त्यांची तब्येत बिघडत चालली, आंदोलनाची तीव्रता वाढू लागली.

अखेरीस मंत्री अतुल सावे मैदानात उतरले. त्यांनी थेट उपोषणस्थळी हजेरी लावत संघटनेच्या नेत्यांशी संवाद साधला. वातावरण चिघळलेलं असतानाच निर्णायक तोडगा निघाला. सरकारकडून दिलेल्या आश्वासनानंतर उपोषण मागे घेण्याची घोषणा झाली आणि परिसरात उसळलेलं वातावरण निवळलं.

ओबीसी महासंघाने मांडलेल्या 14 मागण्यांपैकी तब्बल 12 मागण्या सरकारने मान्य केल्या आहेत. यात शिष्यवृत्ती, वसतिगृह, आर्थिक विकास महामंडळ, नुकसानभरपाई, आरक्षणातील स्पष्ट भूमिका अशा अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश आहे. उर्वरित मागण्यांवर मुख्यमंत्री पातळीवर चर्चा होणार असल्याचं आश्वासन देण्यात आलं आहे.

ओबीसी आरक्षणाला कुठलीही गदा येणार नाही. ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी अर्थ मंत्रालयाकडे प्रस्ताव गेला आहे. नागपूरमध्ये दोन नवी वसतिगृहे उभारण्याचा निर्णय झाला आहे. आर्थिक महामंडळांना एक हजार कोटींहून अधिक निधी देण्यात येणार आहे. शेवटी, सरकारकडून दिलेल्या आश्वासनानंतर बबनराव तायवाडे यांनी उपोषण मागे घेतल्याची घोषणा केली. एक महिन्याच्या आत मागण्यांबाबत शासन आदेश काढले जातील, असंही सरकारने स्पष्ट केलं आहे. म्हणजेच, सहा दिवस पेटलेलं नागपूरचं रणांगण अखेर सरकारच्या तडजोडीमुळे शांत झालं. आता खरी परीक्षा सरकारच्या शब्दांना कृतीत उतरवण्याची आहे!

# सहा फुटांपर्यंतच्या सगळ्या मूर्तींचे कृत्रिम तलावातच विसर्जन

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ४ :** पर्यावरणाचे आणि नैसर्गिक जलस्त्रोतांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध करण्याचा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाला (एमपीसीबी) पूर्ण अधिकार आहे. त्यामुळे, सहा फुटापर्यंतच्या सर्व गणेशमूर्ती कृत्रिम तलावात विसर्जित करण्याच्या एमपीसीबीच्या निर्णयात हस्तक्षेप करणार नाही, असे उच्च न्यायालयाने गुरूवारी स्पष्ट केले. तसेच, याच कारणास्तव प्राचीन वास्तूचा दर्जा असलेल्या बाणगंगा तलावात पर्यावरणपूरक मूर्तींचे विसर्जन करू देण्याची मागणी न्यायालयाने फेटाळ्ली.

सहा फुटांपर्यंतच्या मूर्तींचे कृत्रिम तलावात विसर्जन करण्याचा उच्च न्यायालयाचा २४ जुलै रोजीचा आदेश आणि त्याअनुषंगाने मूर्ती विसर्जनाबाबत राज्य सरकारने प्रसिद्ध केलेली मार्गदर्शक तत्त्वे ही केवळ प्लास्टर ऑफ पॅरिसपासून (पीओपी) तयार केलेल्या मूर्तींपुरती मर्यादित आहेत. त्यामुळे, दक्षिण मुंबईस्थित बाणगंगा तलावात पर्यावरणपूरक मूर्तींचे विसर्जन करू देण्याची मागणी मलबार हिलस्थित संजय शिर्के यांनी याचिकेद्वारे केली होती. न्यायालय आणि सरकारचे आदेश पीओपी मूर्तींपुरते मर्यादित असताना एमपीसीबीने त्याच्याशी विसंगत भूमिका घेऊन पर्यावरणपूरक मूर्तींचेही कृत्रिम तलावात विसर्जन करण्याचे आदेश गणेश चतुर्थीच्या आदल्या दिवशी



काढल्याचा दावा याचिकाकर्त्यांने केला होता.

तसेच, बाणगंगामध्ये मूर्ती विसर्जनास परवानगी देण्याची मागणी केली होती. तथापि, सरकारने मान्य केल्यानुसार, कृत्रिम तलावात मूर्ती विसर्जनास प्रोत्साहन देण्यासाठी एमपीसीबीने हा आदेश काढला आहे आणि कोणीही बाणगंगा किंवा अन्य नैसर्गिक जलस्त्रोतात मूर्ती विसर्जनाचा मूलभूत हक्क असल्याचा दावा करू शकत नाही, असे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठाने नमूद केले आणि याचिका फेटाळली.

स्वच्छ हवा आणि पाणी मिळण्याचा प्रत्येक नागरिकाला मूलभूत अधिकार आहे. त्यामुळे, पर्यावरण आणि नैसर्गिक जलस्त्रोतांच्या संरक्षणाबाबत निर्णय घेण्याचा आणि त्यानुसार आवश्यक ते आदेश देण्याचा एमपीसीबीला पूर्ण अधिकार आहे. व्यक्तिगत अधिकाराच्या तुलनेत व्यापक जनहित सर्वोच्च आहे. त्यामुळे, सहा फुटांपर्यंतच्या सर्व गणेशमूर्तींचे कृत्रिम तलावात विसर्जन करण्याचा एमपीसीबीचा आदेश जनहिताचा असून त्यात आम्ही हस्तक्षेप करणार नाही, असेही न्यायालयाने याचिकाकर्त्यांना दिलासा नाकारताना स्पष्ट केले.

याशिवाय, यापूर्वी बाणगंगेत अनेकांनी विसर्जन केल्याचा दावा करताना आतापर्यंत किती आणि केव्हा मूर्ती विसर्जित केल्या याचा तपशील याचिकाकर्त्यांनी सादर केलेला नाही. याउलट, बाणगंगा तलावाला प्राचीन वास्तूचा दर्जा असून तेथे कधीही विसर्जनास परवानगी दिलेली नाही हे सरकारने म्हटलेले आहे.

# श्रध्दा, उत्साह आणि पर्यावरणाची जबाबदारी!

गणपती बाप्पा मोरया...
पुढच्या वर्षी लवकर या...
गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनाचा आत्मा आहे. दहा दिवस भक्तिभावाने घरोघरी आणि सार्वजनिक मंडळांत विराजमान झालेल्या गणरायाचा निरोप म्हणजेच गणेश विसर्जन. गणपती बाप्पा मोरया, पुन्हा वर्षी लवकर या... या गजरात नाचत-गात, ढोल-ताशांच्या तालावर, फुलांच्या वषार्वात गणेशाच्या मूर्तीचे विसर्जन केले जाते. परंतु या जल्लोषामागे काही गंभीर प्रश्न दडलेले आहेत, जे आपण विसरतो. गणेश विसर्जन म्हणजे केवळ धार्मिक विधी नाही. मातीपासून तयार झालेली मूर्ती जलात विसर्जित करणे म्हणजेच गणेश पुन्हा पंचतत्त्वात विलीन होणे, जीवन आणि मृत्यूच्या शाश्वत सत्याचा स्वीकार करणे होय. त्यामुळे हा विधी आत्मचिंतन व अध्यात्माचा संदेश देणारा आहे.

------------

गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशीपर्यंत गणेशोत्सव साजरा केला जात असतो. गणेश चतुथीर्पासून गणपती बाप्पा संपूर्ण देशभर आपल्या भक्तांच्या घराघरात विराजमान होतात. गणेशोत्सव सुरू झाल्यानंतर दहाव्या दिवशी संपतो, जेव्हा मूर्ती सार्वजनिक मिरवणुकीत संगीत आणि सामूहिक मंत्रोच्चारात नेली जाते, त्यानंतर नदी किंवा समुद्रासारख्या जवळच्या पाण्यात विसर्जित केली जाते, ज्याला विसर्जन म्हणतात.

गणेश विसर्जनाच्या वेळी मंत्रोच्चार केल्याने गणपती बाप्पा प्रसन्न होतो आणि भक्तांवर आशीवार्दाचा वर्षाव करतो आणि त्यांना जीवनात सुख, समृद्धी आणि आनंद देतो. घरांमध्ये आणि सार्वजनिक पंडालमध्ये गणेशमूर्ती स्थापित करणे आणि त्यानंतरचे विसर्जन हे विश्वातील निर्मिती आणि विघटन चक्राचे प्रतीक आहे.

विसर्जन मिरवणुका समाजातील ऐक्याचे द्योतक आहेत. वेगवेगळ्या समाजघटकांतील, पिढ्यांतील, वर्गांतील लोक एकत्र येतात. उत्साह, गजर, नृत्य, फुलांचा वर्षाव यातून सामूहिक आनंद प्रकट होतो. परंतु हाच उत्साह कधी कधी बेभान होतो आणि ध्वनीप्रदूषण, वाहतूककोंडी, अपघात अशा समस्याही वाढतात.

सर्वात गंभीर बाब म्हणजे विसर्जनामुळे होणारे जलप्रदूषण. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती, रासायनिक रंग, प्लॅस्टिकच्या सजावटी या थेट नद्या, तलाव, समुद्राचे पाणी दूषित करतात. जलीय प्राण्यांचा मृत्यू होतो, पिण्याच्या पाण्यावरही परिणाम होतो.

विसर्जनानंतर तलावांच्या काठावर विखुरलेले कचरे, फुलांच्या माळा, न वापरलेली सजावट हे शहराचे कुरूप चित्र दाखवतात. उत्सवाचा आनंद घेणे प्रत्येकाचे हक्क आहे. पण या आनंदासोबत निसर्गाची काळजी घेणे ही आपली जबाबदारी आहे.

मातीच्या मूर्तींचा वापर, नैसर्गिक रंग, कृत्रिम तलावांत विसर्जन, प्लॅस्टिक टाळणे हे उपाय आपण स्वीकारले पाहिजेत. अनेक शहरांमध्ये ह्यघरगुती विसर्जन तलावह्ण ही संकल्पना लोकांनी हळूहळू आत्मसात केली आहे, ही सकारात्मक बाब आहे.

बऱ्याच लोकांना वाटते की, गणेशाची प्राण प्रतिष्ठापना फक्त चतुथीर्लाच होते, तर तसे नाही. काही ठिकाणी प्रतिप्रदेला गणरायाची प्राण प्रतिष्ठापना केली जाते. प्रतिपदेपासून दशमीपर्यंत असे १० दिवस हा उत्सव साजरा केला जातो. काही ठिकाणी गणेश चतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत असे १० दिवस गणेशोत्सव साजरा होतो.

गणपतीची प्राण प्रतिष्ठापना केल्यानंतर त्याची पूजा करून विसर्जन करण्याचे हे व्रत एक किंवा दीड दिवसाचे आहे. पण उत्सवात आणखी रंगत आणण्यासाठी किंवा कित्येक जण नवस पूर्ण करण्यासाठी पाच दिवस, सात दिवसांनी गणेशमूर्तीचें विसर्जन करतात. त्यामागे कोणतेही शास्त्रीय कारण नाही.

गणेशभक्त आपल्या हौसेनुसार गणेशमूर्तीचें विसर्जन दीड, दोन, पाचव्या किंवा सातव्या किंवा दहाव्या दिवशी करतात. हे दिवस आनंदात-उत्साहात गेल्यानंतर गणपती बाप्पाला निरोप देण्याची वेळ येते आणि नियमानुसार प्रथेनुसार गणेशाचे विसर्जन करण्याची प्रथा आहे.





प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

गणपती विसर्जनाशी निगडीत अनेक गोष्टी आहेत. त्यापैकी एक म्हणजेच गणपतीला जल तत्वांचा अधिपती मानलं जातं.

त्यांच्या विसर्जनाचं मुख्य कारण तर हेच आहे की, अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणपतीची पूजा-अर्चा करून त्यांना पुन्हा पाण्यात विसर्जित केलं जातं. म्हणजेच ते ज्याचे अधिपती आहेत तिथे त्यांना पोहोचवलं जातं.

निसर्गाच्या प्रत्येकच गोष्टीचे एक चक्र आहे, ज्या गोष्टीची सुरुवात होते तिचा शेवट हा नक्कीच होतो. निसर्गाचा हा कालचक्राचा नियम गणेश विसर्जनातून दिसून येतो. निसर्गाच्या अंशापासून गणपतीची मूर्ती तयार होते आणि शेवटी निसर्गतःच ती विलीन होते. गणेश विसर्जनाच्या वेळेस विसर्जन हे फक्त मूर्तीचेच करायचे नसते तर आपल्यातील दुगुर्णांचे सुद्धा करायचे असते.

अनंत चतुर्दशीचा दिवस, एकट्या मुंबईत वषार्ला सुमारे दीड लाख मूर्तीचे विसर्जन केले जाते. गणपती विसर्जन पाण्यातच कां केले जाते, या विधी मागे सुध्दा काही धार्मिक कारणे आहेत. तसेच हिंदू धर्मात अनेक विधी हे निसगार्शी निगडीत आहे.

निसर्गाशी एकरूपता राखण्याचा संदेश वेगवेगळ्या पद्धतीने कायमच दिला जातो, गणपती विसर्जनांच्या बाबतीतही असेच आहे. ज्यावेळी महर्षी व्यास महाभारताची निर्मिती करत होते, त्यावेळी गणपती बाप्पा लेखनिकाची भूमिका बजावत होते. महाभारत लिहिण्याचे काम हे दहा दिवस अविरतपणे चालू होते. त्यामुळे गणपती बाप्पांनी शरीर गरम न व्हावे म्हणून अंगाला माती लिंपल्याचे उल्लेख आहे. हा गणपती बाप्पांचा विशेष अवतार असल्यामुळे त्यांना दहा दिवसानंतर जलसमाधी देतात अशी वंदता आहे.

कदाचित या दहा दिवसात बाप्पाची ऊर्जा टिकून राहावी म्हणून नैवैद्यासाठी गोडधोड, मोदक वगैरे करण्याची परंपरा आहे. अहोरात्र लिहिण्याच्या कामामुळे शरीर उष्ण झाल्यामुळे पाण्यात डुबकी मारल्याविना गत्यंतर नव्हती असेही अख्यायिका आहे. त्यामुळे गणपतीचे विसर्जन अनंत चतुर्दशीच्या दिवशी करतात.

गणेश विसर्जन हा आपल्या संस्कृतीतील श्रद्धा, भक्ती आणि एकात्मतेचा उत्सव आहे. मात्र तो पर्यावरणाच्या हानीचा कारणीभूत ठरू नये. बाप्पा पुन्हा वर्षी लवकर या...असे गजर करताना आपण त्याला प्रदूषित नद्या, रासायनिक कचऱ्याचा डोंगर दाखवला तर ती खरी भक्ती ठरेल का? आता वेळ आली आहे की श्रद्धा आणि जबाबदारी यांचा समतोल राखावा. गणेशोत्सव पर्यावरणपूरक झाला तरच आपले मोरया खऱ्या अर्थाने गजर ठरेल.

# शिक्षक दिन!

आज ५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा आज जन्मदिवस. त्यांच्याच स्मरणार्थ आजचा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो.



१९६२ मध्ये राधाकृष्णन यांनी राष्ट्रपती पदाची शपथ घेतली तेव्हा त्यांनी त्यांचा जन्मदिवस हा शिक्षकांचा गौरव दिवस म्हणून साजरा करण्याची इच्छा प्रकट केली होती. देशातील शिक्षकांचा गौरव हाच आपला गौरव असल्याची त्यांनी सांगितले होते. तेव्हापासून सुरू झालेली ही परंपरा अजूनही सुरूच असून भविष्यातही सुरूच राहील.

आपल्या संस्कृतीत शिक्षकाला म्हणजे गुरूला मानाचे स्थान आहे. प्रत्येक व्यक्तीच्या जडणघडणीत गुरूंची म्हणजे शिक्षकांची भूमिका खूप महत्वाची असते. शिक्षक हा केवळ मार्गदर्शक नसतो तर तो जीवनाला दिशा दाखवणारा दिशादर्शक असतो. भारतीय शिक्षण परंपरेत गुरु शिष्यांचा संबंध अत्यंत पवित्र मानला आहे. प्राचीन काळी गुरुकुल पध्दत होती. विद्यार्जन करण्यासाठी विद्यार्थी घरदार सोडून गुरूच्या घरी राहण्यास येत असे. गुरु हा त्या शिष्यांच्या मातापित्यांची जागा घेत असे. शिष्याला केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे तर शिष्याला चारित्र्यसंपन्न करणे हे कर्तव्य आहे या विचारप्रेरणेतून गुरु विद्यादान करत असे.

शिष्याच्या जीवनात गुरुला सर्वोच्च स्थान असत आणि गुरूच्या जीवनातही शिष्याला सर्वोच्च प्राधान्य असे. याप्रमाणे त्याकाळी गुरु शिष्य संबंध पवित्र बंधनाने युक्त होते. आज काळ बदलला असला तरी शिक्षकांचे महत्व कमी झाले नाही.

आजच्या विज्ञान युगातही पूर्वीप्रमाणेच शिक्षकांची आवश्यकता भासते. मनुष्याच्या जीवनातून शिक्षक वजा होऊच शकत नाही. जर शिक्षकच नसेल तर मनुष्याच्या जीवनाची दिशा भरकटू शकते. मनुष्याचे जीवन भरकटलेल्या नौकेसारखे होईल म्हणूनच शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली जाते. केवळ आपल्याच देशात नव्हे तर ऑस्ट्रेलिया, कॅनडा, ब्राझील, जर्मनी, जपान, इंडोनेशिया, मलेशिया, चिली या देशातही शिक्षक दिन साजरा केला जातो. मात्र तिथे हा दिवस ५ ऑक्टोबरला साजरा केला जातो.

आपल्या देशात हा दिवस ५ सप्टेंबरला साजरा केला जातो. कारण याच दिवशी १८८८ साली भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म तामिळनाडूतील तिरुथानी या गावी एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. अतिशय हुशार व कुशाग्र बुद्धीचे असल्याने त्यांनी शिक्षण क्षेत्रात स्वतःचे वेगळे वलय निर्माण केले. आंध्र विद्यापीठ आणि बनारस विश्व विद्यापीठाचे कुलगुरुपद त्यांनी भूषवले. १९३१ ते १९३९ या काळात ते संयुक्त राष्ट्रसंघात भारताचे प्रतिनिधी होते.

१९४९ ते १९५२ पर्यंत ते रशियामधील भारताचे राजदूत होते. १९५२ साली ते भारताचे पहिले उपराष्ट्रपती बनले. या पदावर दहा वर्ष राहिल्यानंतर १९६२ साली ते भारताचे दुसरे राष्ट्रपती बनले. १९५४ साली त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविण्यात आले. शुद्ध चारित्र्य, प्रकांड पांडित्य, अपार सहिष्णुता आणि प्रभावी वक्तृत्व यामुळे डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी जगभर विलक्षण लोकप्रियता मिळवली म्हणूनच नोबेल पुरस्कारासाठी त्यांना तब्बल २७ वेळा नामांकन मिळाले.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

शिक्षक ते राष्ट्रपती ही त्यांची वाटचाल त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष आहे. त्यांच्या याच कर्तृत्वाचा सन्मान म्हणून सरकारने १९६२ पासून त्यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करायला सुरवात केली. आजच्या या शिक्षक दिनी देशभरातील शिक्षक बंधू भगिनींना शिक्षक दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

# कर्तृत्ववान व आदर्श शिक्षक

आपल्या भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस म्हणजेच ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून संपूर्ण भारतात साजरा केला जातो. डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिल्यामुळे त्यांच्या सन्मानार्थ हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो.

या दिवशी प्रत्येक शाळेतील व महाविद्यालयातील विद्यार्थी आपल्या शिक्षकांना मनःपूर्वक वंदन करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व आदर व्यक्त करतात आणि त्यांना शिक्षक दिनाच्या खूप खूप शुभेच्छा देतात. तसेच शाळेत व महाविद्यालयात विद्यार्थ्यांना जीव ओतून आणि तळमळीने शिकवणाऱ्या कर्तृत्ववान व आदर्श शिक्षकांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना शिक्षक दिनानिमित्त विविध पुरस्कार देऊन प्रशासन व विविध सामाजिक संघटना त्यांचा सन्मान करते.

परंतु आजकाल खऱ्या शिक्षकांच्या कार्याची दखल न घेता, जो शिक्षक राजकारणी लोकांच्या जवळचा आहे किंवा संबंधातील आहे? अशाच शिक्षकांना पुरस्कार दिला जात आहे. मग तो शिक्षक व्यसनी असो, कामचुकार असो किंवा टंगळमंगळ करणारा असो, त्यांना पुरस्कार दिला जात आहे.



बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी, ता.अहमदपूर
जि. लातूर
7498715661

जो शिक्षक पुरस्काराच्या लायकीचा आहे आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी तळमळीने शिकवणारा आहे, अशा लायक व पात्र शिक्षकांना डावलून व्यसनी, कामचुकार व टंगळमंगळ करणाऱ्या राजकारणी शिक्षकांना पुरस्कार देऊन सन्मानित केले जात आहे. यामुळे शिक्षण क्षेत्राला कलंक लागत आहे. शिक्षण क्षेत्राकडे बघण्याचा लोकांचा दृष्टिकोन बदलून गेला आहे.

शिक्षण क्षेत्रातील पावित्र्य डागाळत आहे. पण जे शिक्षक खरोखर आदर्श व कर्तृत्ववान आहेत, विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी व त्यांचे भवितव्य घडवण्यासाठी जीव ओतून व तळमळीने शिकवतात, अशा शिक्षकांना खरेतर पुरस्काराची हाव नसते, विद्यार्थी घडवणे आणि त्यांना चांगला नागरिक बनवणे, हाच त्यांचा खरा पुरस्कार असतो. अशा कर्तृत्ववान व आदर्श शिक्षकांना मनःपूर्वक सलाम करावा वाटतो.

माझे शिक्षक व गुरुवर्य बबनराव गुळवे गुरुजी हे माझ्या गावातील जिल्हा परिषद प्रशाला खंडाळी शाळेत एक आदर्श व कर्तृत्ववान शिक्षक तथा मुख्याध्यापक म्हणून शिक्षकी पेशाला खरा न्याय देत आहेत. शाळेत वेळेवर येणे, वर्गात वेळेवर जाणे, जादा तासिका घेऊन शिकवणे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासाबरोबरच संस्काराचे धडे देणे आणि परिपाठाच्या वेळी विद्यार्थ्यांना बोधकथा सांगणे, हे गुळवे सर निस्वार्थ भावनेने, कोणत्याच पुरस्काराची किंवा सन्मानाची अपेक्षा न ठेवता तळमळीने व तन-मन-धनाने आपले कार्य करतच राहतात.

अशा शिक्षकांची प्रत्येक शाळेला नितांत गरज आहे. परंतु दुर्दैवाने आजकाल असे शिक्षक शाळेला लाभणे दुर्मिळ झाले आहे. अशा शिक्षकांची संख्या वाढणे काळाची गरज आहे. त्यासाठी प्रत्येक शिक्षकांनी स्वतःचे आत्मपरीक्षण करून शिक्षकी पेशाला खरा न्याय देण्याचे काम प्रामाणिकपणे करावे आणि शिक्षण क्षेत्राला लागलेला कलंक पुसून काढावा. कारण ही सध्या काळाची गरज आहे.

गुळवे सर सुप्रसिद्ध गणित शिक्षक तर आहेतच, परंतु ते एक सुप्रसिद्ध लेखक, कवी व वक्ते आहेत. शिक्षकी पेशा सांभाळत साहित्य क्षेत्रात मोलाचे योगदान देणे आणि लिखाणाच्या व वक्तृत्वाच्या माध्यमातून समाज परिवर्तन करणे ही साधी गोष्ट नाही.

दिवसभर शाळा करून संध्याकाळी लिखाण करणे हे खरोखरच खूप मोठे काम आहे. गुळवे सरांचे अनेक विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रात मोठमोठ्या पदावर कार्यरत आहेत. आजवर गुळवे सरांनी अनेक विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवून त्यांच्या जीवनाचे सोने केले आहे. गुळवे सरांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य खरोखरच उल्लेखनीय आहे.

आपल्या वर्तनातून व अध्यापनातून ते इतर सहकारी शिक्षकांवर आपल्या विलक्षण कार्याची जबरदस्त छाप पाडत असतात. माझ्या खंडाळी गावातील जिल्हा परिषद शाळेत गुळवे सर गणित शिक्षक म्हणून जवळपास वीस वर्षे झाली आपली सेवा बजावत आहेत.

आमचे खंडाळीकर गुळवे सरांना आमच्या प्रशालेचे भूषण व वैभव समजतात. त्यांची होऊ लागलेली बदली आमच्या गावकऱ्यांनी अनेक वेळा एक होऊन थांबवली आहे. गुळवे सर हे एक शिक्षकी पेशातील आदर्श व कर्तृत्ववान शिक्षक आहेत. त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानामुळे त्यांचे विद्यार्थी दहावी बोर्ड परीक्षेत गणित विषयात शंभर पैकी १०० गुण घेऊन उत्तीर्ण होतात.

आमच्या जिल्हा परिषद शाळेतील गुळवे सर हे एक विद्यार्थी प्रिय शिक्षक आहेत, शाळेतील विद्यार्थी त्यांच्यावर जीव ओवाळून टाकायला सुद्धा मागेपुढे पाहत नाहीत. गुळवे सरांसारखे कर्तृत्ववान, गुणी, ज्ञानी व आदर्श शिक्षक आमच्या खंडाळी प्रशालेला लाभणे हे आमच्या खंडाळीकरांचे खरोखरच भाग्य आहे, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

शिक्षक दिनानिमित्त शिक्षण विभागाला एवढेच सांगावे वाटते की, पुरस्कार देताना शिक्षकांच्या कार्याची अगोदर पडताळणी करा...राजकारणी लोकांचे ऐकून अपात्र व नालायक शिक्षकांना पुरस्कार देऊन आदर्श व कर्तृत्ववान शिक्षकांच्या भावना दुखवू नका...शिक्षकांच्या कार्य व कर्तृत्वाचा आढावा घेऊनच त्यांची पुरस्कारासाठी निवड करा...उगाच कोणालाही पुरस्कार देऊन शिक्षण क्षेत्राला कलंकित करू नका...तरच शिक्षण क्षेत्राला चांगले दिवस येतील आणि लोकांचा बघण्याचा दृष्टिकोन सुद्धा निकोप असेल...आज शिक्षक दिनानिमित्त निरपेक्ष भावनेतून शिक्षकी पेशाला न्याय देणाऱ्या प्रामाणिक, कर्तृत्ववान व आदर्श शिक्षकांना कोटी कोटी वंदन...

माझ्या खंडाळी प्रशालेची आन-बान शान आणि आदर्श व कर्तृत्ववान शिक्षक तथा माझे मार्गदर्शक गुरु बबनराव गुळवे गुरुजी यांना शिक्षक दिनानिमित्त साष्टांग दंडवत आणि कोटी कोटी वंदन...



## !! मागणे !!

आज कृतार्थ भावाने
तुला जोडूनिया हात।
देवा, मागू का रे काही?
लावताना फुलवात।।

माझ्या दिठीत वसावे
तुझे मोहकसे बिंब।
तुज्या अथांग कृपेचा
एक गवसावा थेंब।।

माझा कण-कण देह
वंचितांच्या कामी यावा।
आणि मनाचा आरसा
सदा नितळ रहावा।।

सदा पांघराया मिळो
तुझ्या कृपेचा पदर।
देवा चैतन्यस्वरूपा
हाच एक द्यावा वर।।

■ वीणा डोंगरवार
नागपूर.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शिक्षकाची भूमिका किती प्रभावी

(राष्ट्रीय शिक्षक दिन विशेष ५ सप्टेंबर २०२५)
शिक्षकांना पालकांच्या बरोबरीचे मानले जाते. पालकांनंतर, मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक सर्वात जास्त जबाबदार असतात. असे म्हटले जाते की देशाच्या भावी पिढ्या प्रगती करतील की विनाश, या दोन्ही गोष्टी शिक्षकाच्या भूमिकेवर अवलंबून असतात. कारण, ज्ञानाधारित अध्यापनाद्वारे, शिक्षक विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमता ओळखून त्यांना सक्षमपणे सुधारतो. दुसरीकडे, जर एखादा शिक्षक त्याच्या भूमिका आणि पदाची प्रतिष्ठा विसरला तर त्याचे परिणाम संपूर्ण समाजाला दीर्घकाळ भोगावे लागतात.

------------------

शिक्षक हे गुणांची खाण असल्याचे म्हटले जाते, ज्यामध्ये विषय ज्ञान, संवाद कौशल्य, अध्यापनाची आवड, सकारात्मक दृष्टिकोन, सर्जनशील विचारसरणी, संशोधक, संयमी, चारित्र्यवान, सत्य, बुद्धिमान, मेहनती, सहनशील, मृदुभाषी, वेळेचे मूल्य जाणणारा, कोणत्याही भेदभावाशिवाय सर्व विद्यार्थ्यांकडे समानतेने पाहणारा, त्यांची कौशल्ये समजून घेणारा, विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी नेहमीच संघर्ष करणारा हे असे गुण शिक्षकात असतात. हे गुण खऱ्या शिक्षकाची ओळख आहे.

शिक्षक हे विद्यार्थ्यांसाठी आदर्श मार्गदर्शक, प्रेरणेचे स्त्रोत आणि मित्र असतात, जे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात सर्वात महत्त्वाची भूमिका बजावतात. विद्यार्थ्यांच्या नैतिक आणि चारित्र्य विकासात शिक्षकांचे मोलाचे योगदान असते. म्हणजेच, शिक्षक विद्यार्थ्यांना शिक्षित करतातच सोबत त्यांना चांगले जीवन जगण्यास सक्षम आणि त्यांना सुजान नागरिक बनवतात.

शिक्षणाचा खरा अर्थ केवळ पुस्तकी ज्ञान किंवा तांत्रिक कौशल्ये आत्मसात करणे असा नाही, तर ती एक अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक, नैतिक आणि आध्यात्मिक क्षमतांचा सर्वांगीण विकास होतो. ज्ञान आणि अनुभवाद्वारे एखाद्या व्यक्तीला बुद्धिमान, संवेदनशील आणि समाजासाठी उपयुक्त बनवणे हा त्याचा उद्देश आहे, जेणेकरून तो जीवनातील समस्या सोडवू शकेल आणि एक सुसंस्कृत नागरिक बनू शकेल.

एक काळ असा होता जेव्हा शिक्षण हे समाजसेवेचा एक भाग होते, तेव्हा समाजसुधारक शिक्षणाची ज्योत प्रज्वलित करण्यासाठी आणि समाजात एक नवीन क्रांती घडवून आणण्यासाठी संघर्ष करत असत, पण आजच्या व्यापारीकरणाच्या युगात शिक्षणाकडे व्यवसाय म्हणून पाहिले जाते.

देशातील उच्च सरकारी अधिकारी, नेते, कर्मचारी आणि स्वतः सरकारी शिक्षकही त्यांच्या मुलांना महागड्या खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण देण्यास प्राधान्य देतात. कारण ते कदाचित सरकारी शिक्षण व्यवस्थेवर समाधानी नसतील आणि श्रीमंत कुटुंबातील मुले थेट परदेशात शिक्षण घेण्यास प्राधान्य देतात. दरमहा एक लाख ते दीड लाख रुपये पगार मिळवणारे सरकारी शिक्षकही त्यांच्या मुलांना खाजगी शाळांमध्ये शिकवतात, असे का घडते?

सरकारी शिक्षकांना त्यांच्या स्वतःच्या शिक्षण व्यवस्थेवर विश्वास नाही का? सर्वात पवित्र मानल्याजाणाऱ्या शिक्षक वर्गातही अनेक घृणास्पद घटना शिक्षण जगताला कलंकित करत आहेत, आजही देशातील ही परिस्थिती फारशी बदललेली नाही. सध्या महाराष्ट्र राज्यातही सरकारी शालार्थ आयडी घोटाळा चर्चेत आहे. शेकडो सरकारी अनुदानित शाळांमधील शिक्षकांचे खोटे आकडे दाखवून वर्षानुवर्षे पगाराच्या नावाखाली सरकारचे कोट्यवधी रुपये लुटले जाण्याचे धंदे सर्रास सुरु होते.

शिक्षणातही भ्रष्टाचार शिगेला पोहोचला आहे, त्याबद्दल सर्वांना माहिती आहे, पण त्याविरुद्ध कोणीही बोलू इच्छित नाही. महाराष्ट्र राज्यातील सरकारी अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये शिक्षक भरतीच्या नावाखाली भ्रष्टाचाराच्या बातम्या आपण अनेकदा पाहतो, ऐकतो आणि वाचतो.

ही भरती एका गठित समितीद्वारे केली जाते, विद्यापीठाच्या कुलगुरू आणि राज्य सरकारच्या मंत्र्यांकडे तक्रार करूनही, सुधारणेच्या नावाखाली फक्त आश्वासने ऐकू येतात. आतापर्यंत सरकारने या भरतींची पूर्ण जबाबदारी स्वतः कडे घेतलेली नाही. अशा व्यवस्थेत, पात्रता असूनही प्राध्यापक होण्याचे गरीब आणि प्रामाणिक लोकांचे स्वप्न संघर्ष आणि भ्रष्टाचारात दबले जाते.



डॉ. प्रितम भी. गेडाम
८२३७४ १७०४१
prit00786@gmail.com

देशातील काही आर्थिकदृष्ट्या सक्षम खाजगी शैक्षणिक संस्थांची स्थिती समाधानकारक आहे, परंतु बहुतेक खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये, कदाचित सर्वात शिक्षित शिक्षक सर्वात कमी पगारावर काम करतात.

अनेक खाजगी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये शिक्षकांना रोजंदारी कामगारापेक्षा कमी वेतन मिळते. यासोबतच, एका पदावर काम करताना, त्यांना संस्थेची इतर कामे देखील करावी लागतात. या क्षेत्रातील बेरोजगारीचा दरही सर्वाधिक आहे. आजच्या महागाईच्या काळात, २५००-३००० रुपये दरमहा पगार काहीच महत्त्वाचा नाही. तरीही मोठ्या संख्येने शिक्षक या पगारावरही काम करत आहेत, ही आपल्यासाठी खूप लाजिरवाणी आणि दुःखाची बाब आहे.

------------------

(उर्वरीत भाग पुढील अंकी)

# दररोज सकाळी रिकाम्या पोटी सुके नारळ खाल्ल्याने शरीरात काय बदल होतात



नारळ असो किंवा मग नारळ पाणी आपल्यासाठी किती महत्त्वाचं असतं हे आपल्या सर्वांनाच माहित आहे. एवढंच नाही तर नारळ तेलही आपल्या ब्यूटी रेमीडीमध्ये आपण वापरतो.पण ते नारळ पाणी असो, नारळाचे तेल असो, नारळाचा गर असो किंवा सुका नारळ असो. अगदी त्याची पानेही अनेक गोष्टी बनवण्यासाठी वापरली जातात. अनेकांना हे माहित नसेल की, जर दररोज सकाळी रिकाम्या पोटी नारळ किंवा सुके नारळ खाल्ले तर त्याचा आरोग्यावर काय परिणाम होतो? काय फायदे मिळतात?

### रिकाम्या पोटी सुके नारळ खाण्याचे फायदे

### ऊर्जा वाढवण्यासाठी उपयुक्त

नारळामध्ये हेल्थी फॅट्स असतात. हे फॅट्स शरीराला ऊर्जा देण्याचं काम करतात. अशा परिस्थितीत, सकाळी रिकाम्या पोटी कोरडे म्हणजे सुका नारळ खाल्ल्याने शरीर दिवसभर ऊर्जावान राहते आणि थकवा कमी होतो. व्यायाम करणाऱ्या किंवा रोजच्या धावपळीच्या जीवनशैली जगणाऱ्या लोकांसाठी नारळ विशेषतः फायदेशीर आहे. त्यामुळे शरीराला आलेला थकवा जाणवत नाही.

### पचनासाठी फायदेशीर

नारळामध्ये फायबर आणि नैसर्गिक प्रोबायोटिक्स असतात जे आतड्यांचे आरोग्य सुधारतात. अशा परिस्थितीत, दररोज सकाळी रिकाम्या पोटी नारळ खाल्ल्याने पचन सुधारते. यामुळे बद्धकोष्ठता, पोट फुगणे आणि अपचन यासारख्या समस्या कमी होऊ शकतात.

### रोगप्रतिकारशक्ती वाढवते

नारळामध्ये लॉरिक ॲसिड असते जे शरीराला विषाणू, बॅक्टेरिया आणि संसगार्शी लढण्यास मदत करते. याशिवाय, त्यात पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि ॲंटीऑक्सिडंट्स असतात जे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. नारळ नियमितपणे खाल्ल्याने सर्दी आणि खोकला सारख्या आजारांचा धोका कमी होतो.

### त्वचेसाठी नैसर्गिक मॉइश्चरायझर

नारळातील निरोगी फॅट्स त्वचेला आतून हायड्रेट ठेवतात. यामुळे त्वचा मऊ आणि चमकदार राहते. नारळाचे तेल नैसर्गिक मॉइश्चरायझर म्हणून देखील काम करते आणि मुरुमे, कोरडेपणा आणि तेलकट त्वचेच्या समस्या कमी करते.

### रक्तातील साखर नियंत्रित ठेवते

नारळाचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो, त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांसाठी तो एक चांगला पर्याय आहे. त्यात असलेले इन्युलिन फायबर रक्तातील साखरेची पातळी स्थिर ठेवण्यास मदत करते. अशाप्रकारे, नारळ तुमच्यासाठी एक सुपरफूड म्हणून काम करू शकते. तसेच तुम्ही वर्षभर तुमच्या आहारात त्याचा समावेश करू शकता.

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### सामाजिक उत्सव संहिता

समाज हिताचे ठेवूनी भान
उपक्रम सर्वांनी राबवावे
पण आपल्या उपक्रमाचे
कोणतेही उपद्रव मुल्य नसावे!

वर्गणी असो की देणगी
स्वखुशीने स्विकारावे
टेंशन येईल दात्याला
असे कार्यकर्तांचे वर्तन नसावे..!

डीजेच्या स्फोटक आवाजाने
कान बधीर तर छाती धडधडते
हार्ट पेशंटच्या जिवालाच
धोका नाही का गडे?

लेजरच्या प्रखर किरणांनी
दृष्टीवर होतो दुष्परिणाम
मंडळांनो सदविचार करा
सामाजिक आरोग्याची
ठेवा जाण!

## ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी केले वृक्षारोपण

**वणी :** सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी संघ वणी-मारेगाव-झरी या संघाचा दुसरा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात साजरा केला. यावर्षीच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून संघाने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी ड्रीमलँड सिटीत वृक्षारोपणाचा विशेष कार्यक्रम आयोजित केला होता. वर्धापन दिनानिमित्त ग्रंथालय कर्मचारी संघाने गेल्या वर्षभरातील आपल्या कामाचा आढावा घेतला. संघटक गजानन कोकुडे यांनी कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी नेहमी मार्गदर्शन करणार असल्याचे सांगितले. यावेळी कोषाध्यक्ष शुभम कडू, सदस्य अमोल पेटकर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी संघटनेचे सदस्य आणि सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रंथालय कर्मचारी संघाचे सचिव प्रमोद लोणारे यांनी आभार मानले.

# सोयाबीनवर येलो मोजॅकचा प्रकोप; शेतकरी हवालदिल

**यवतमाळ, दि.४, महासागर प्रतिनिधी:** दारव्हा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी यावर्षीचा खरीप हंगाम पुन्हा एकदा संकट घेऊन आला आहे. सततच्या पावसामुळे आधीच चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतात आता सोयाबीन पिकावर येलो मोजॅक रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

हा रोग झपाट्याने पसरत असून अनेक शेतांमध्ये सोयाबीनच्या पिकाला पिवळसरपणा येऊ लागला आहे. त्यामुळे पाने कोमेजून उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होण्याची भीती निर्माण झाली आहे.

सोयाबीन हे तालुक्यातील प्रमुख नगदी पीक असून मोठ्या प्रमाणावर शेतकरी त्याची लागवड करतात. मात्र येलो मोजॅक हा विषाणूजन्य रोग असून तो पांढऱ्या माशीद्वारे पसरतो. त्यामुळे पिकाची वाढ खुंटते व शेंगा भरून येत नाहीत. परिणामी उत्पादनावर थेट परिणाम होतो. अनेक शेतकऱ्यांनी



या रोगाचा प्रकोप वाढत असल्याने हतबलता व्यक्त केली आहे. 'दरवर्षी सोयाबीनच्या उत्पादनावरच घरखर्च व मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी असते. पण आता दिसतंय की उत्पादन निम्म्याहून अधिक घटणार. कर्ज कसं फेडायचं, घर कसं चालवायचं ही मोठी समस्या आहे,' अशी व्यथा शेतकरी ज्ञानेश्वर ठक यांनी व्यक्त केली.

या गंभीर परिस्थितीकडे कृषी विभाग व कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ मात्र निद्रावस्थेत असल्याची खंत शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे. आजवर पिकाच्या नुकसानीचा आढावा घेण्यासाठी कोणतीही तातडीची पाहणी झालेली नाही. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार प्रशासनाने तातडीने पाहणी करून आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी होत आहे.

तज्ज्ञांच्या मते, योग्य वेळी उपाययोजना न केल्यास येलो मोजॅकचा फैलाव संपूर्ण तालुक्यात होण्याची शक्यता आहे.

## पावसाच्या पाण्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान

**उमरखेड, दि.४, महासागर प्रतिनिधी:** पिरंजी ते मेट या रस्त्याचे काम झाल्यानंतर रस्त्यालगत नाली न काढल्यामुळे पावसाचे पाणी रस्त्याच्या बाजूने थेट शेतात शिरत आहे. यामुळे शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून शेतकऱ्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. उमरखेड तालुक्यात यावर्षी पावसामुळे हाहाकार माजला असून अनेक शेत शिवारे अजूनही पाण्याखाली आहेत. काही ठिकाणी नैसर्गिकरित्या पाणी साचले आहे, तर काही ठिकाणी रस्त्याच्या कामामुळे पाण्याचा निचरा न झाल्याने पिकांचे नुकसान होत आहे. पिरंजी रस्ता तयार करताना त्याच्या बाजूला नाली तयार करण्यात आलेली नाही, त्यामुळे पावसाचे पाणी शेतात तुंबून राहते आणि



पिकांची नासाडी होते. या समस्येमुळे शेतकऱ्यांचा त्रास वाढत असून तो पुढेही सुरू राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी संबंधित विभागाकडे लवकरात लवकर नाली बांधकाम करणे किंवा नाली करण्यासाठी परवानगी देण्याची मागणी केली आहे.

कृष्णापूर येथील शेतकरी प्रल्हाद कांडलकर आणि प्रशांत कांडलकर यांनी या संदर्भात अर्जाद्वारे संबंधित अधिकाऱ्यांकडे विनंती केली आहे.

# बोर्डा ते मोहोर्ली रस्त्याची झाली दुरवस्था

**वणी , दि.४, महासागर प्रतिनिधी:** तालुक्यातील बोर्डा ते मोहोर्ली या महत्त्वाच्या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. रस्त्यावर जागोजागी मोठे खड्डे पडले असून, पावसाळ्याच्या दिवसांत त्यात पाणी साचल्याने अपघातांचा धोका वाढला आहे.

या गंभीर प्रश्नाकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष झाल्याचा आरोप करत, मनसेने आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. मनसेचे तालुकाध्यक्ष फाल्गुन गोहोकार यांनी जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या उपविभागीय



अभियंत्यांना निवेदन दिले. या रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. विद्यार्थी, रुग्ण आणि ज्येष्ठ नागरिकांना या रस्त्यावरून ये-जा करताना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक ठिकाणी रस्त्याचा डांबर पूर्णपणे उखडले असून, केवळ माती आणि दगडांचा थर शिल्लक राहिला आहे. यामुळे वाहनांचे मोठे नुकसान होत आहे, तसेच प्रवास वेळ आणि खर्चही वाढला आहे. येत्या काही दिवसांत या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तातडीने सुरू झाले नाही, तर मनसे शांत बसणार नाही. या प्रश्नावर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल आणि त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. रस्त्याचे काम करावे अन्यथा आंदोलनाचा इशारा तालुकाध्यक्ष फाल्गुन गोहोकार यांच्या नेतृत्वाखाली शंकर बोरगलवार, सोमेश्वर ढवस, उमेश नवले, प्रवीण दुमोरे, मयूर घाटोळे, भोला चिकनकर, लकी उपरे, सूरज काकडे, धीरज बगवा, उमेश सातपुते, अमोल पारखी, मारोती सातपुते, बाळू सोनटक्के, अमोल राजूरकर आर्दीसह अनेक महाराष्ट्र सैनिकांनी दिला आहे.

# रेशीम विभाग आपल्या दारी, तुती लागवड वाढविण्यासाठी मोहिम

**यवतमाळ , दि.४, महासागर प्रतिनिधी:** जिल्ह्यात रेशीम शेतीला मोठ्या प्रमाणात वाव आहे. नैसर्गिक परिस्थितीवर मात करुन शेतकऱ्यांना आर्थिक उन्नती साधण्यासाठी रेशीम शेती प्रमुख पर्याय ठरु शकतो. पारंपारिक पिकांसोबतच कमी खर्चात अधिक उत्पादन देणाऱ्या पिकांकडे शेतकऱ्यांनी वळावे, यासाठी रेशीम शेतीला प्राधान्य दिले जात आहे. शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने तुती लागवड करुन रेशीम कोषाचे उत्पादन घेऊन आर्थिक उन्नती साधावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

रेशीम शेतीसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत तीन वर्षांसाठी प्रति एकर ४ लक्ष ३२ हजार २४० रुपयांचे अनुदान दिले जाते. रेशीम शेती वर्षांतून एकापेक्षा जास्त वेळा उत्पन्न मिळवून देणारी व कमी खर्चाची असल्याने याकडे शेतकऱ्यांनी वळावे यासाठी शासनाकडून मनरेगा व सिल्क समग्र-२ या योजनांमथुन अनुदान दिल्या जाते. या अनुदानाचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांकडे किमान एक एकर जमीन तसेच बारमाही सिंचनाची सोय उपलब्ध असावी. जिल्ह्यात रेशीम तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी दरवर्षी महारेशीम अभियान राबविण्यात येते.

रेशीम शेती ही अपारंपारीक शेती असल्यामुळे शेतकरी रेशीम शेतीकडे वळत नाही. मोठ्या प्रमाणात नोंदणी होऊन सुध्दा तुती लागवड कमी होते. यासाठी हरित महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र अभियानांतर्गत रेशीम विभागास नेमून दिलेल्या ४ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पुर्ततेकरीता रेशीम विभाग आपल्या दारी मोहिम राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी महारेशीम अभियानांतर्गत नोंदणी केली परंतु तुती लागवड केली नाही, अशा शेतकऱ्यांना रेशीम उद्योगाचे महत्व पटवून देऊन रेशीम उद्योग करण्यास प्रेरित करण्याच्यादृष्टीने रेशीम विभाग आपल्या दारी अभियान रेशीम दिन ३० सप्टेंबरपर्यंत राबविण्यात येणार आहे.

अभियानामध्ये जिल्ह्यातील मागील दोन वर्ष व चालू वर्षामध्ये नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना प्रादेशिक उपसंचालक, सहायक संचालक यांच्या स्वाक्षरीनिशी शेतकरीनिहाय गृहभेट घेऊन त्यांना ते पत्र क्षेत्रीय कर्मचारी यांच्यामार्फत सुपूर्द करण्यात येईल. पत्रासोबत सिल्क समग्र योजनेंतर्गत पूर्वसंमती मिळण्याबाबत कोरे मागणी अर्जही पुरविण्यात येईल. क्षेत्रीय कर्मचाऱ्यांकडून रेशीम शेती बाबत मार्गदर्शनही मिळणार आहे. जिल्ह्यातील रेशीम उद्योग करण्यास ईच्छुक शेतकऱ्यांनी 'जिल्हा रेशीम कार्यालय, प्रशासकिय इमारत, पहिला माळ, यवतमाळ येथे संपर्क साधावा व रेशीम उद्योग व शासकीय योजनांची माहिती जाणुन घेऊन रेशीम शेतीकडे वळावे, असे आवाहन जिल्हा रेशीम विकास अधिकारी विलास शिंदे यांनी केले आहे.

## राम कथा पर्वासाठी मोफत ट्रॅव्हल्स सुविधा

**यवतमाळ:** मोरारी बापू यांचा राम कथा पर्व सोहळा यवतमाळ चिंतामणी येथील मार्केट यार्डवर ६ सप्टेंबरपासून १४ सप्टेंबरपर्यंत होणार असून, पांढरकवडा तालुक्यातील भाविकांना याचा लाभ घेता यावा, यासाठी येथील अष्टविनायक ट्रॅव्हल्सचे संचालक संजय चमेडिया यांनी ७ सप्टेंबरपासून दररोज आठही दिवस निःशुल्क बसफेरीचे नियोजन केले आहे. ही बस अष्टविनायक ट्रॅव्हल्सच्या



कार्यालयापुढून रविवारपासून दररोज सकाळी ७:३० वाजता यवतमाळसाठी प्रस्थान करणार आहे. यवतमाळवरून ही बस दुपारी पांढरकवडासाठी ३:०० वाजता परत निघणार असल्याची माहिती संजय चमेडिया यांनी दिली. ही सेवा निःशुल्क असून, या सेवेचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

## गोंडेगाव-टाकळी बस नियमित सुरु करा

**दारव्हा :** तालुक्यातील गोंडेगाव ते टाकळी या मार्गावरील एस.टी. बस नियमित वेळेवर सुरू ठेवावी, अशी विद्यार्थ्यांकडून होत आहे. सध्या या मार्गावर एस. टी. बस अनियमितपणे धावत असल्याने विद्यार्थ्यांना शाळा व कॉलेजला पोहोचण्यास अडचणी निर्माण होत आहेत. त्याचबरोबर गोंडेगाव, टाकळी, पिंपळगाव, अंभोरा, खामखेडा आदी गावातील नागरिकांनाही वैद्यकीय उपचार, बाजारात खरेदीसाठी किंवा कामानिमित्त बाहेर जाण्यासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. बस वेळापत्रक निश्चित करून ती नियमितपणे चालवली गेल्यास ग्रामीण भागातील अनेकांचे दैनंदिन जीवन सुसह्य होईल. तसेच विद्यार्थ्यांना वेळेवर शिक्षणासाठी पोहोचता येईल. असे मत स्थानिक नागरिकांनी व्यक्त केले आहे.

## दिव्यांग शाळा संघटनेतर्फे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांचे स्वागत

**यवतमाळ:** जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अंतर्गत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. मंदार पत्की यांच्या आदेशानुसार



समाजकल्याण अधिकारी मा. श्रीमती मंगला मुन यांना प्रभार देण्यात आला. कार्यालयाचे सक्षमीकरण ३१ ऑगस्ट २०२५ रोजी करण्यात आले. यावेळी दिव्यांग शाळा संघटना जिल्हा यवतमाळतर्फे अध्यक्ष शेख रफिक शेख इब्राहीम व उपाध्यक्ष सचिन निलपवार यांच्या हस्ते मा. जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी श्रीमती मंगला मुन, वैसाका अधिकारी सचिन महल्ले व समाजकल्याण निरीक्षक सुजित ठाकरे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी अधिकारी मंडळींनी दिव्यांग व्यक्तींकरिता राज्य व केंद्र सरकारतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत पोहोचविण्याचा विश्वास व्यक्त केला. तसेच समाजातील शेवटच्या घटकापर्यंत या योजनांची अंमलबजावणी कार्यालया मार्फत प्रभावीपणे केली जाईल, अशी हमीदेखील त्यांनी दिली.

# कोसरे कलार समाजतर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिर आज

**यवतमाळ , दि.४, महासागर प्रतिनिधी:** महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना व कोसरे कलार समाज यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. शशांत जयस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर शुक्रवार, दि. ५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत कोसरे कलार समाज भवन, वंजारी फैल, जोडवीहिर येथे होणार आहे.

समाजातील सर्व बांधवांनी या शिबिराचा लाभ घ्यावा,



असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. या उपक्रमासाठी कोसरे कलार समाजाचे अध्यक्ष विनायकराव कावरे, कोसरे कलाल समाजाचे सचिव सुधाकर उके, महाराष्ट्र कलाल-कलार समाजाचे जिल्हा अध्यक्ष नितीन मेश्राम, जिल्हा संघटक गणेश कोसरकर, विदर्भ उपाध्यक्ष राजू शेंडे, जिल्हा उपाध्यक्ष नितीन उके व सागर खोब्रागडे (विधिसल्लागार), विभागीय अध्यक्ष डॉ. गणेश नाईक, कार्याध्यक्ष सुरेश पटले, संतोष मानकर (विदर्भ संपर्कप्रमुख), युवा अध्यक्ष रोहित कोसरकर , सचिन कावरे तसेच अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभले आहे.

या शिबिरात समाज बांधवांनी उपस्थित राहून आरोग्य तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## तुरीचे दर साडेसहा हजार रुपयांपर्यंत घसरले

**यवतमाळ:** हंगामापूर्वी सुस्थितीत असलेली तूर पुन्हा दर घसरल्याने अडचणीत आली आहे. खुल्या बाजारामध्ये तुरीची कमतरता असताना बाजारात तुरीचे दर घसरल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. सध्या बाजारात पाच हजार ८०० ते सहा हजार ४४५ रुपये क्विंटल दराने तूर विकली जात आहे. हे दर शेतकऱ्यांना न परवडणारे आहे. यातून चिंता व्यक्त होत आहे.

## युवासेनेने आंदोलनाचा पवित्रा घेताच बंद लिफ्ट होणार सुरू

**वणी, दि.४, महासागर प्रतिनिधी:** येथील महावितरण उपविभागीय कार्यालय तिसऱ्या मजल्यावर असून लिफ्ट बंद असल्याने नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत होता. अशात युवासेनेचे उपजिल्हाप्रमुखांनी आंदोलनाचा इशारा देताच प्रशासनाने लिफ्ट तत्काळ सुरू करणार असल्याची माहिती दिली. महावितरण उपविभागीय कार्यालयाचे तिसऱ्या मजल्यावर स्थलांतर झाल्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयीचा सामना करावा लागत होता. लिफ्ट बंद असल्याने वृद्ध, महिला, शेतकरी व ग्रामीण भागातून येणाऱ्या ग्राहकांना कार्यालयात पोहोचणे कठीण झाले होते. अशातच युवासेना उपजिल्हा प्रमुख अजिंक्य शेंडे यांनी कार्यकारी अभियंता महावितरण यांना निवेदन सादर करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली होती. अन्यथा महावितरण कार्यालयावर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला होता.

प्रशासनाने याची दखल घेत नागरिकांच्या सोयीसाठी लवकरच आवश्यक उपाययोजना करण्यात येणार असल्याची माहिती दिली. विश्वास अजिंक्य शेंडे यांनी यावेळी व्यक्त केला.

# मान्सून क्रिकेटमध्ये वणी प्रथम झरी द्वितीय

**झरी जामणी, दि.४, महासागर प्रतिनिधी:** तालुक्यातील युवक काँग्रेसद्वारा एक दिवसीय मान्सून क्रिकेट सामन्याचे आयोजन रविवारी ३१ ऑगस्ट रोजी मुकूटबन येथील आदर्श हायस्कूलचे पटांगणात केले. या मान्सून क्रिकेट सामन्यात एकुण आठ संघ सहभागी झाले. प्रत्येक संघाला ६ ओव्हर देण्यात आले.

या सामन्यात फायनल मध्ये वणी येथील "अमरदिप एलेवन संघ वणी" ने "जिल्हा परिषद एलेवन संघ झरी वर मात करून १९५ हजार रुपयाचे प्रथम क्रमांक पटकाविले. तर मैन ऑफ द सिरीज वणी येथील रवी राजूरकर ठरला.



अतिशय रोमांचक झालेल्या सामन्यात झारी तालुका सरपंच संघटनाचे अध्यक्ष निलेशभाऊ येल्टीवार यांचे कडून १५ हजार रुपयाचे प्रथम बक्षीस "अमरदीप एलेवन संघ वणी" या संघाने पटकावले तर वणी विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष राहुल धांडेकर यांचे कडून १० हजार रुपयाचे द्वितीय बक्षिस "जिल्हा परिषद एलेवन संघ झरी" या संघाने पटकावले, मॅन ऑफ द सिरिज मुख्याध्यापक सुरेंद्र गेडाम यांचेकडून व गणेशभाऊ बेलेकर यांच्या कडून रोख रक्कम आणि आकर्षक ट्रॉफीचे बक्षीस वितरण करण्यात आले. दुपारी १:०० वाजता पासून तर सामने संपे पर्यंत समालोचक म्हणून संतोष मुडे यांनी विशेष कामगीरी बजावली, बक्षीस वितरणाच्या वेळी निलेश येल्टीवार, राहुल धांडेकर, चेतन मॅकलवर, प्रशांत बघेले, संतोष कोहळे, सचिन डहाके, कार्तिक येल्टीवार, सचिन येनगुवार, मनोज अडपावार, प्रज्योत येनपोतुलवार, अंकित येनपोतुलवार, आशिष ठाकरे, विकास ठाकरे, रजनीकांत अण्णा, दिग्वीजय बघेले व ईतर मान्यवर, खेळाडू आणि प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

फायनल मध्ये ग्रामीण गटामधून जिल्हा परिषद संघ एलेवन झरी व शहरी गटातून अमरदिप एलेवन संघ वणी मध्ये अंतिम सामना खेळविण्यात आला असता जिल्हा परिषद संघ एलेवन झरी यांनी प्रथम फलंदाजी करताना सहा ओव्हर मध्ये सर्व गडी बाद ३९ धावा केल्यानंतर अमरदीप संघाने एकही गडी न गमावता तीन ओव्हर मध्येच लक्ष पूर्ण केले. रवी राजुरकर यांना मॅन ऑफ द सिरीज (सामनावीर) पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## » संक्षिप्त...

### दारू दुकाने बंद ठेवण्याची मागणी



**वणी :** येत्या ५ सप्टेंबरला ईदच्या दिवशी दारूची दुकाने बंद ठेवण्यात यावी, अशी मागणी एआयएमआयएमचे शहराध्यक्ष आसिम हुसैन यांनी प्रशासनाकडे केली आहे. या दिवशी मुस्लीम धर्माचे पैगंबर हजरत मोहम्मद यांचा जन्मदिवस जश्न ए-ईद-मिलाद उत्सवी म्हणून साजरा केला जातो. ईद हा सण मुस्लीम समुदायासाठी एक पवित्र दिवस असतो आणि या दिवशी दारूच्या विक्रीमुळे शांतता व सुसंवादावर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे वणी नगरपरिषद हद्दीतील देशी व विदेशी दुकाने बंद ठेवण्यात यावी, अशी मागणी केली. निवेदन देताना संघटनेचे साकिब अहमद खान, तौसीफ खान, सरफराज शेख, रेहान शेख, मो. वाइस, मो. सोहेल, शाकिर खान, रिजवान शेख, अरबाज शेख व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

### नफीस अहमद खान यांचा सत्कार



**दारव्हा :** एम. एन. यु. एच. स्कूल आणि एस. एम. ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स, दारव्हा येथे ३ सप्टेंबरला माजी विद्यार्थी नफीस अहमद खान यांचा महाराष्ट्र राज्य पात्रता परीक्षा (एमएच-सेट) गणित विषयात यशस्वी झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. हा सन्मान संस्थेचे सचिव आणि प्राचार्य नुमान नबील मुहम्मद इलियास तसेच एच. के. एम. सी.यु.एच. स्कूलचे मुख्याध्यापक मुदस्सिर खान मुसा खान यांच्या हस्ते पार पडला. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मुहम्मद इलियास मुहम्मद शफी, अभियंता गझनफरुल्ला खान आणि आरिफ मेमन उपस्थित होते. नफीस यांनी विद्यार्थ्यांसमोर आपल्या शैक्षणिक प्रवासावर प्रकाश टाकला आणि त्यांच्या यशाचे अनुभव शेअर केले. यावेळी मुख्याध्यापक मुदस्सिर खान आणि समारंभाचे अध्यक्ष आरिफ मेमन यांनी आपले विचार व्यक्त केले.

### गणेशमूर्ती स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुसद :** विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना वाव देण्यासाठी आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मातीची श्रीगणेशमूर्ती निर्मिती स्पर्धा श्री ज्ञानेश्वर संस्थानमध्ये आयोजित केली होती, या स्पर्धेला विविध शाळांच्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. गट 'अ'मध्ये प्रथम



क्रमांक वैष्णवी मांजरे, द्वितीय राणी जाधव आणि तृतीय क्रमांक अस्मी व्यवहारे यांनी पटकावला. गट 'ब'मध्ये प्रथम श्रुतिका तगलपल्लेवार, द्वितीय चंदन राठोड आणि तृतीय क्रमांक आदर्श जाधव यांनी तर गट 'क'मध्ये प्रथम क्रमांक अनुष्का मस्के, द्वितीय आराध्या मगर आणि तृतीय क्रमांक स्नेहल पाटील पटकावला. विजेत्यांना संस्थानचे अध्यक्ष बिपीन चिद्दरवार, परीक्षक नितीन पाटील, सदस्य उदय चिद्दरवार यांनी गौरवचिन्ह देऊन सन्मान केला. निरीक्षक म्हणून नितीन पाटील, अमोल ताजनेकर यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन रामकृष्ण बगाडे, भूषण जाधव यांनी केले. यशस्वीतेसाठी दिनेश पापीनवार, कृष्णा पदमवार, मनोज येरावार, चौधरी आदींनी पुढाकार घेतला. यावेळी विद्यार्थ्यांसह पालक व नागरिकांची उपस्थिती होती.

### घराची भिंत कोसळली, प्रशासनाकडे मदतीची मागणी

**दारव्हा :** तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना घरांच्या नुकसानीचा सामना करावा लागत आहे. दी. ३१ ऑगस्टला पळशी येथील धनराज वामनराव मांगे यांच्या घराची भिंत कोसळून त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या घटनेमुळे त्यांच्या कुटुंबाला सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून,



पावसाळ्यातील उर्वरित दिवसात राहणे धोकादायक ठरणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. या संदर्भात धनराज मांगे यांनी प्रशासनाने तात्काळ पाहणी करून मदत द्यावी, अशी मागणी केली आहे. अतिवृष्टीमुळे ग्रामीण भागातील अनेकांच्या घरांना तडे गेले असून, तत्काळ उपाययोजना करण्याची गरज असल्याचे स्थानिकांनी सांगितले.

### अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयात क्रीडा स्पर्धा

**यवतमाळ :** मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त शासकीय अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ येथे राष्ट्रीय क्रीडा दिवस साजरा केला. यानिमित्त विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजय माने होते. आजच्या पिढीने ध्यानचंदांच्या एकाग्रतेचा वारसा अंगिकारणे हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल असे मत डॉ. माने यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला डॉ. जयश्री उघाडे, डॉ. आनंद भुसारी, डॉ. थोरात, डॉ. सांगळे, प्रा. सावळे, प्रा. नाकाडे व सर्व महाविद्यालयांचे कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रगती पुडे हिने सूत्रसंचालन केले. प्रथम वर्षाचे विद्यार्थी रवी बुरसे, अंकिता शिरसाट, सोहम मुने, अंकिता शिरसाट यांनी विचार व्यक्त केले. महाविद्यालयामध्ये विविध खेळांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये व्हॉलिबॉल, क्रिकेट, बॅडमिंटन, चेस, रस्सीखेच, लगोरी, १०० मीटर, २००२ मीटर रनिंग या स्पर्धांचा समावेश होता.

: आरएनआय रजिस्ट्रेशन क्रमांक :
-२०१०/३५७९९-
महासागर यवतमाळ
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्णा तन्मुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, बस स्टँड चौक, होटल प्रकाश जवळ, यवतमाळ येथे प्रकाशित केले. संपादक-श्रीकृष्ण तनमुखदास चांडक मुख्य कार्यालय पोन-०७१२-२७६७६२८-९९२२९७००२३ स्थानिक संपादक-रघुवीरसिंह चौहान फोन-९४२३४३३२४४ (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहिल.)

# अस्मिता

## कल्पकतेतून उद्योजकता



मानिनी ||

मालविका सक्सेना मूळची मथुरेची. एका पारंपरिक कुटुंबातली.मालविकाने बीएससी व एमबीए पूर्ण केले. नोकरीसाठी बँकेच्या परीक्षाही दिल्या. पण त्यात यश मिळाले नाही. मालविकाचे कुटुंबीय तिच्यासाठी योग्य जोडीदार शोधू लागले. पण मालविकाला मात्र इतक्यात लग्न करायचेनव्हते. ती महत्त्वाकांक्षी होती. तिला काहीतरी वेगळे करायची इच्छा होती. एमबीए पूर्ण झाल्यावर मालविकाने लग्न टाळण्यासाठी मथुरा येथील एका फॅशन डिझाइनिंग संस्थेत प्रवेश घेतला. नंतर तिने त्याच संस्थेत काम करायला सुरुवात केली. एक दिवस मालविकाच्या धाकट्याबहिणीने फेकून देण्यासाठी काही जुने बूट काढले. पण ते टाकून देण्याऐवजी त्यावर काहीतरी नावीन्यपूर्ण करावेसे मालविकाला वाटले. तिने त्या बुटांवर एक सुंदर डिझाइन तयार केले. अम्बिकाने ते बूट कॉलेजमध्ये घातल्यावर तिच्या मैत्रिणींना ते खूप आवडले आणि त्यांनी मालविकाला त्यांच्यासाठीही तसेच डिझाइन बनवण्यास सांगितले.त्यामुळे नोकरी करण्याऐवजी मालविकाने स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला. फक्त पाच हजार रुपयांत व इंस्टाग्रामवरून २०१८ मध्ये तिने 'द क्रिर्की नारी'हा ब्रँड सुरू केला. तिची डिझाईन्स दीपिका कक्कर, प्रियंका चोप्रा, रवीना टंडन, सनी लिओनी, रुबिना दिलैक अशा सेलिब्रिटींकडून वापरली गेली आणि तिच्या ब्रँडला प्रसिद्धी मिळाली. २०२२ मध्ये तिने शार्क टँक इंडियावर तिने आपली कल्पना सादर केली. अनुपम मित्तल व विनिता सिंग यांच्याकडून तिला ३५ लाखांची गुंतवणूक मिळवली. तिच्या ब्रँडला जबरदस्त प्रसिद्धी मिळाली.विक्रीत विक्रमी वाढ झाली. सध्या तिच्या टीममध्ये १७ जण काम करतात.बहुतेक विक्री तिच्या स्वतःच्या वेबसाइटवरून तसेच ॲमेझोन, मिंत्रा, नायका यांसारख्या प्लॅटफॉर्मवरून होते. पर्यावरणपूरक साहित्य आणि रीसायकल वापर या तत्त्वांवर ती ब्रँड चालवते. मथुरेतून सुरू झालेला हा प्रवास आता राष्ट्रीय पातळीवर पोहोचला आहे. तिचे वार्षिक उत्पन्न ५० लाख रुपयांहून अधिक झाले आहे. पारंपरिक विचारांच्या चौकटीतून बाहेर पडून स्वतःची ओळख निर्माण करणारी मालविका सक्सेना ही आज उद्योजकतेतील प्रेरणादायी उदाहरण ठरली आहे.

**एक दिवस मालविकाच्या धाकट्याबहिणीने फेकून देण्यासाठी काही जुने बूट काढले. पण ते टाकून देण्याऐवजी त्यावर काहीतरी नावीन्यपूर्ण करावेसे मालविकाला वाटले. तिने त्या बुटांवर एक सुंदर डिझाइन तयार केले. अम्बिकाने ते बूट कॉलेजमध्ये घातल्यावर तिच्या मैत्रिणींना ते खूप आवडले आणि त्यांनी मालविकाला त्यांच्यासाठीही तसेच डिझाइन बनवण्यास सांगितले.**

## व्हा उद्योजिका

स्किल डेव्हलपमेंट ||

तुम्हाला यशस्वी व्यावसायिक महिला बनायचे असेलतर सर्वप्रथम तुम्हाला तुमच्या व्यवसायाची कल्पना स्पष्ट असणे आवश्यक आहे. अनेक वेळा आपण इतरांच्या यशाने इतके प्रभावित होतो की आपणही तोच व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतो. पण खरोखर, तुम्हाला हा व्यवसाय करण्यात स्वारस्य आहे का हे तुम्ही आधी ठरवण्याची गरज आहे. यानंतर, व्यवसायात गुंतवणुकीसाठी आवश्यक असलेल्या भांडवलाबद्दल आणि त्याची जोखीम आणि बाजारपेठेबद्दल देखील पुरेशी माहिती मिळवा. लक्षात ठेवा,छोट्या प्रमाणावर सुरू झालेले व्यवसाय हळूहळू वाढू शकतात आणि मोठं यश मिळवू शकतात. त्यामुळे सुरुवातीला व्यवसाय छोट्या प्रमाणावर सुरू केला तरी चालेल. कारण जेव्हा तुम्ही कमी भांडवल गुंतवता, तेव्हा तोटाही कमी होतो. नोकरी आणि व्यवसायातील सर्वात मोठा फरक म्हणजे इथे तुम्हाला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. इतकेच नाही तर कधी कधी कठोर परिश्रमानंतरही तुम्हाला तुमच्या व्यवसायात नफा मिळवता येत नाही. त्यामुळे तुम्हाला एक यशस्वी व्यावसायिक महिला बनायचे असेलतर तुम्ही नवीन आव्हाने स्वीकारण्यासाठी तयार असले पाहिजे. तेव्हा पूर्ण विश्वास ठेवा आणि ठाम रहा. व्यवसाय करत असताना कधी नफा तर कधी तोटा सहन करावा लागतो. पण याचा अर्थ असा नाही की तुमच्यात यशस्वी व्यावसायिक महिला होण्याचे गुण नाहीत. तेव्हा तुम्ही स्वतःच्या क्षमतेवर आणि निर्णयांवर विश्वास ठेवा आणि पुढे जा.



## असा पिकवा कांदा

परसबाग ||



कांद्याच्या वाढत्या किंमतीमुळे सर्वांच्याच डोळ्यात पाणी आलं आहे. नेहमीच्या दुप्पट-तिप्पट दराने मिळणारा कांदा जपून वापरणं ओघाने आलंच. कांदा मनसोक्त खाताच येत नाही. पण हा महागडा कांदा बाजारातून आणण्याऐवजी घरीच पिकवला तर... कांदा घरी पिकवणं शक्य आहे. कांद्याच्या लागवडीची प्रक्रिया जाणून घेऊ.

कांद्याची शेती अगदी सोप्या पद्धतीने करता येते. कांद्याच्या लागवडीसाठी फार जागाही लागत नाही. कांद्याच्या वाढीसाठी वातावरण थंड आणि आल्हाददायक लागतं. आर्द्रता आणि पाऊस कांद्याच्या पिकाला चालत नाही. त्यामुळे नोव्हेंबर ते फेब्रुवारी हा काळ कांद्याच्या लागवडीसाठी उत्तम मानला जातो. थोडी मोकळी जागा किंवा अगदी कुंडीतही कांद्याची लागवड करता येते. पण कांद्याला सुपीक आणि कसदार माती लागते, ही बाब नेहमी लक्षात ठेवावी.

लागवडीसाठी सर्वप्रथम कांद्याच्या बिया लागतील. या बिया नर्सरीतून किंवा ऑनलाईन विकत घेता येतील. ट्रे, सेंद्रीय खतं, शेण, पाणी हे साहित्य लागेल. कांद्याची लागवड करण्यासाठी त्याच्या बिया एक दिवस पाण्यात भिजवून ठेवा. या बियांमधलं पाणी काढून टाका आणि त्या दोन ते तीन दिवस मोकळ्या जागेत ठेवा. आता ट्रेमध्ये माती घाला आणि त्यात कांद्याच्या बियांची पेरणी करा. कांद्याच्या बियांना अंकुर फुटायला सहा ते आठ आठवडे लागतात.

तेवढ्या वेळात कांदा लागवडीसाठीची जागा तयार करून घ्या. बाल्कनी, गच्ची, मोकळी जागा यापैकी कशाचीही निवड करता येईल. कांद्यासाठी चांगलं खतही लागेल. शक्यतो सेंद्रीय खतांचा वापर करा. दरम्यानच्या काळात ट्रेमधल्या रोपट्यांकडे लक्ष ठेवा. वेळेत पाणी घालत रहा. कांद्याच्या वाढीसाठी माती ओलसर रहायला हवी. ट्रेमध्ये पेरलेल्या बियांना अंकुर फुटल्यावर कुंडीत किंवा मोकळ्या जागेत लागवड करा. कांदा जमिनीखाली उगवत असल्यामुळे दोन रोपट्यांच्या मध्ये साधारण १५ सेंटीमीटरचं अंतर असायला हवं. यामुळे कांद्याची वाढ योग्य प्रकारे होईल. साधारण चार ते पाच महिन्यांनंतर कांदे कापणीसाठी तयार होतील. कांद्याचा वरचा भाग मातीतून बाहेर दिसू लागला की कापणीसाठी तयार झाला असं समजावं. पात पिवळी पडू लागली की कांद्याचं पीक मातीतून बाहेर काढता येईल. कांदा बाहेर काढल्यानंतर दोन ते तीन दिवस बाजूला ठेऊन द्या. त्यानंतर पात कापून टाका. आता या कांद्याचा वापर तुम्ही करू शकता.

## दूर करा मासिक पाळीच्या तक्रारी

डाएट अँड न्यूट्रिशन ||

महिलांना मासिक पाळीशी संबंधित अनेक समस्या असतात. काहीजणींची पाळी अनियमित असते. काहींना या काळात वेदना जाणवतात. तसंच इतर तक्रारीही असतात. काही नैसर्गिक घटकांमुळे या समस्यांवर नियंत्रण मिळवता येतं. अशाच काही नैसर्गिक घटकांविषयी जाणून घेऊ.

▶ थंडीत गूळ खाल्ला जातो. गूळ उष्ण असल्यामुळे नियमित सेवन केल्यास मासिक पाळीच्या काही तक्रारी दूर होऊ शकतात. मासिक पाळी अनियमित असेल तर गूळ खाता येईल. मासिक पाळी दरम्यान पोटात गोळे येण्याची समस्याही गुळामुळे दूर होऊ शकते.



▶ 'क' जीवनसत्त्वामुळे मासिक पाळी नियमि होऊ शकते. पपई, अननस, लिंबू, संत्री अशी 'क जीवनसत्त्वयुक्त फळं खाता येतील. या फळांमधून भरपूर प्रमाणात 'क' जीवनसत्त्व असतं.

▶ आल्याच्या सेवनामुळेही मासिक पाळी नियमि होऊ शकते. मासिक पाळी उशीरा येत असेल किं अनियमित असेल तर सकाळी उठल्यानंतर आलं आणि मधाचं मिश्रण घ्या. यामुळे हार्मोन्सचं संतुलन साधलं जातं आणि मासिक पाळी सुरळीत होते.

▶ हळद घातलेलं दूध प्यायल्यामुळेही मासिक पाळीच्या तक्रारी दूर होऊ शकतात.

▶ कॅफेनयुक्त पदार्थांच्या सेवनामुळेही मासिक पाळी सुरळीत होऊ शकते. तुम्ही नियमित कॉफी पिऊ शकता. यासोबतच मासिक पाळीतल्या वेदनाही कमी होऊ शकतात.

▶ मासिक पाळीदरम्यान पोटफुगीची तक्रार असेल तर बीट खाता येईल. मासिक पाळीदरम्यान होणारी पोटफुगी ही सर्वसामान्य बाब आहे. यामुळे पोटात वेदना जाणवतात. बीटामधलं कॅल्शियम, फॉलिक ॲसिड आणि लोहामुळे बराच फरक जाणवतो.

## मूग आणि कांद्याच्या पातीचे पॅटिस

रसगंधा ||

कटलेट्स वेगवेगळ्या पद्धतीने बनवता येतात. मोड आलेले मूग आणि कांद्याच्या पातीचा वापर करून चविष्ट कटलेट्स किंवा पॅटिस बनवता येतील. संध्याकाळी चहासोबत हा पदार्थ मस्त लागेल.

**साहित्य** : दोन कप मोड आलेले मूग, चिरलेली कांद्याची पात पाव कप, दोन हिरव्या मिरच्या, बारीक ठेचलेला लसूण एक चमचा, मीठ आणि तेल.

**कृती** : मोड आलेले मूग मिक्सरमध्ये रवाळ वाटून घ्या. हे वाटण एका भांड्यात काढून घ्या. त्यात कांद्याची पात, मीठ, हिरव्या मिरचीचे तुकडे, लसूण आणि मीठ घालून मिसळून घ्या. या मिश्रणाचे छोटे चपटे गोळे बनवून घ्या. आता तव्यावर किंवा फ्राईंग पॅनमध्ये तेल थोडं तेल घाला. तेल तापल्यावर मूगाच्या मिश्रणाचे चपटे गोळे ठेवा. सोनेरी रंगावर तळून घ्या. मूग आणि कांद्याच्या पातीचे हे कटलेट्स सॉस किंवा चटणीसोबत खाता येतील.



## एक संकल्प... त्वचेसाठी

ब्युटी टॉक ||



नव्या वर्षात बरेच संकल्प केले जातात. कोणाला वजन कमी करायचं असतं तर कोणाला आर्थिक नियोजनाची ओढ असते. आरोग्यविषयक संकल्पही केले जातात. चला तर, मग आपल्या त्वचेचं सौंदर्य टिकवण्यासाठी काही संकल्प करू या.

● मेक अप अधिक काळ राहिल्यामुळे त्वचा निस्तेज दिसू लागते. चेहऱ्यावर रात्रभर मेक अप ठेवल्यामुळे त्वचेवर वेळेआधीच सुरकुत्या दिसू लागतात. हे टाळण्यासाठी रात्री मेक अप काढून झोपणं गरजेचं आहे. रात्रीच्या वेळी त्वचेची झीज भरून निघते. पण मेक अपमुळे या प्रक्रियेत अडथळे येतात. त्यामुळे कितीही दमणूक झाली तरी मेक अप काढल्याशिवाय झोपू नका.

● झटपट तजेला मिळवण्यासाठी फेस वाईप्सचा वापर केला जातो. फेस वाईप्समुळे चेहरा स्वच्छ होत असला तरी त्वचेचं नुकसान होऊ शकतं. त्वचेच्या स्वच्छतेसाठी क्लिंजर किंवा पाण्याचा वापर करावा. नव्या वर्षात फेस वाईप्स बाजूला ठेऊन द्या.

● सनस्क्रीन कधीही टाळू नका. कडक उन्हातच नाही तर थंडीतही सनस्क्रीन लावायला हवं. यामुळे सूर्याच्या अतिनील किरणांपासून त्वचेचं रक्षण होतं. त्यामुळे उन्हात बाहेर पडताना नेहमीच सनस्क्रीन लावा.

● त्वचेचं आरोग्य राखण्यासाठी भरपूर पाणी पिणं गरजेचं आहे. भरपूर पाणी प्यायल्यामुळे शरीरातली विषद्रव्यं निघून जातात आणि त्वचा छान तजेलदार दिसू लागते. त्वचेच्या आरोग्यासाठी दिवसभरात किमान दोन लीटर पाणी पिणं गरजेचं आहे.

## मनाने दूर झालो आहोत...

काय करू? ||



मी ३८ वर्षांची महिला असून माझ्या लग्नाला दहा वर्षं झाली आहेत. मला आठ वर्षांची मुलगी असून माझा प्रेमविवाह झाला आहे. लग्नाआधी जवळपास सात वर्षं माझी आणि पतीची ओळख होती. तेव्हा सगळं काही सुरळीत सुरू होतं. पण लग्नानंतर सगळं काही बदलत गेलं. आमच्यात दुरावा निर्माण झाला. यामागची नेमकी कारणं मलाही सांगता येणार नाहीत. पण आम्ही एकमेकांपासून मनाने दूर झालो एवढं खरं. आम्ही मुलीच्या भविष्याचा विचार करून एकाच छताखाली परक्याप्रमाणे एकत्र रहात आहोत. आमच्यात भावनिक बंध उरलेले नाहीत. आम्ही समुपदेशकांचीही मदत घेतली. पण कोणताही फायदा झाला नाही. आमच्यातला दुरावा काही केल्या संपत नाही. अशा परिस्थितीत मी काय करू?

– या लग्नाकडून, नात्याकडून असणाऱ्या अपेक्षांचा विचार कर. तुमच्यात दुरावा येण्याच्या कारणांचा शोध घे. तुला नेमकं काय हवं आहे हे समजून घे. यानंतर पतीशी बोल. त्याला विश्वासात घे. तुमच्या दोघांच्या एकमेकांविषयी असणाऱ्या अपेक्षा जाणून घ्या. त्याबद्दल चर्चा करा. कोण कशात कमी पडतंय, हे जाणून घ्या. हे नातं टिकवून ठेवायचं की नाही, याचा निर्णय यानंतरच घेता येईल. हे नातं टिकवून ठेवायचं असेल तर दोघांनी मिळून छोटी छोटी उद्दिष्टं ठरवा. ही उद्दिष्टं पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. कौटुंबिक सहल आयोजित करणं, मुलीचा अभ्यास घेणं, मुलीशी खेळणं अशी काही उद्दिष्ट ठरवता येतील. यासोबतच एखाद्या कार्यशाळेला एकत्र जाणं असे उपक्रमही राबवता येतील. वेगळं होण्याचा निर्णय घेतला तर आपल्या जबाबदाऱ्यांची विभागणी करा. तुम्ही एका मुलीचे पालक आहात ही बाब विसरू नका. लग्न टिकवून ठेवणं तसंच घटस्फोट घेणं या दोन्ही निर्णयांचे परिणाम आणि दुष्परिणाम आहेत. या सगळ्या बाबींचा नीट विचार करून योग्य तो निर्णय घ्या.

## दूर करा स्माईल लाईन्स

स्कीन केअर ||

ओठांच्या आजूबाजूला दिसणाऱ्या सुरकुत्यांना स्माईल लाइन्स किंवा लिप लाईन्स म्हणतात. त्या कमी करण्यासाठी काही घरगुती आणि वैद्यकीय उपाय एकत्र करून वापरले तर जास्त चांगला परिणाम मिळू शकतो. त्यासाठी जीवनशैलीत बदल करायला हवा. भरपूर पाणी प्यायल्यामुळे त्वचेत ओलावा राहातो, त्यामुळे सुरकुत्या कमी दिसतात.सूर्यापासून संरक्षण मिळण्यासाठी रोज किमान एसपीएफ ३० सनस्क्रीन वापरा. कारण उन्हात असलेल्या यूव्ही किरणांमुळे सुरकुत्या वाढतात.झोप योग्य प्रमाणात घ्या. कारण झोप कमी झाली तर त्वचा पटकन थकलेली दिसते. शुद्ध खोबरेल तेलाने किंवा बदाम तेलाने ओठाभोवती हलक्या हाताने रोज रात्री मसाज करा.– दिवसातून एकदा १५ मिनिटे अलोव्हेरा जेल लावल्याने त्वचा मऊ व टाईट होते.व्हिटॅमिन ईकॅप्सूल फोडून त्यातील तेल हलक्या हाताने ओठाभोवती लावा. काही फेस एक्सरसाइजचाही यासाठी चांगला उपयोग होतो. ओठ पुढे करून ज म्हणाल्यासारखा आकार करा, १० सेकंद थांबा. असे १० वेळा करा.स्माईल स्ट्रेच करा. त्यासाठीपूर्ण हसा आणि१० सेकंद ओठ आवळून घट्ट ठेवा. गालांमध्ये दिवसातून २–३ वेळा १० सेकंदांसाठी हवा भरून गाल फुगवा. जर हे घरगुती उपाय पुरेसे नसतील तर त्वचेचा ओलावा वाढवणारे आणि सुरकुत्या मऊ करणारे हायालुरॉनिक ॲसिड सिरम तुम्ही वापरू शकता. कोलॅजन वाढवून त्वचेची लवचिकता सुधारणारे रेटिनॉल क्रीम रात्री ओठांभोवती लावा. मात्र आवश्यकता वाटल्यास डॉक्टरांचा सल्ला जरूर घ्या.



### हेअर केअर

#### स्ट्रेटनर वापरण्याआधी...

अनेकजणी स्ट्रेटनर, कर्लरचा वारंवार वापर करतात. केसांच्या स्टायलिंगसाठी या उपकरणांचा वापर केला जातो. मात्र ही हेअर स्टायलिंग प्रोडक्ट्स सतत वापरल्यामुळे केस खराब होऊ शकतात. केसांचा पोत बिघडू शकतो. केस वारंवार तुटू लागतात. केसांना फाटे फुटू लागतात. वेळोवेळी स्टाईल केल्यामुळे केसांच्या रचनेवरही परिणाम होऊ शकतो. स्ट्रेटनर, कर्लर ही सगळी हीटिंग प्रोडक्ट्स आहेत. तापमान गरजेपेक्षा अधिक असेल तर केस जळू शकतात. त्यामुळे या उत्पादनांचा वापर काळजीपूर्वक करायला हवा.




### लाईफस्टाईल

#### कोणता रंग निवडावा?

भारतीय महिलांचा वर्ण सर्वसाधारणपणे गव्हाळ किंवा सावळा असतो. त्यामुळे आपल्या त्वचेच्या रंगानुसार मेक अप उत्पादनांची निवड करावी लागते. लिपस्टिक असो किंवा फाउंडेशन, चेहऱ्याच्या रंगाला मिळतीजुळती शेड हवी. नेलपॉलिशचंही तसंच आहे. आपल्या त्वचेला साजेसं नेल पॉलिश हवं. पॅशनेट प्लम रंगाचं नेल पॉलिश खूप सुंदर दिसतं. हा रंग बराच काळ टिकूनही राहतो. यासोबतच सोनेरी, रोझ बॅलेट, टोमॅटो रेड, जांभळा हे रंगही भारतीय त्वचेवर शोभून दिसतात.



### स्मार्ट शॉपिंग

#### खरेदी महागड्या वस्तूंची

खरेदी करायला कोणाला आवडत नाही?त्यातही मैत्रिणीची किंवा ऑफिसमधल्या सहकाऱ्याची छानशी साडी किंवा ड्रेस बघून आपल्यालाही असाच एखादा ड्रेस घ्यावासा वाटतो. मग दुकानात जाऊन एखादा ड्रेस निवडला जातो. पण प्रत्यक्षात आपल्याला महागड्या ड्रेस किंवा साडीची गरज आहे का, याचा विचार कधीच केला जात नाही. त्यामुळे गरज नसताना महागडे कपडे विकत घेऊ नका. बाजारातली फॅशन सतत बदलत असते. त्यामुळे आपण घेतलेला ड्रेस दुसऱ्या कोणत्या पद्धतीने वापरता येईल याचही विचार करा.



### किचन टिप्स

#### ॲव्होकॅडो खरेदी करताना...

ॲव्होकॅडो हे फळ बरंच लोकप्रिय झालं आहे. हे फळ तब्बेतीसाठी चांगलं असतं, असं म्हणतात. ॲव्होकॅडोची खरेदी करताना काही गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात. ॲव्होकॅडो नरम आहे याची खात्री करून घ्या. यासाठी हे फळ अंगठ्याने थोडं दाबून बघा. लगेच खायचं नसेल तर फार पिकलेलं फळ घेऊ नका. पिकलेल्या ॲव्होकॅडोचा रंग गडद हिरवा किंवा जांभळट असतो. कच्चं ॲव्हॉकॅडो पोपटी रंगाचं असतं.



## महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांना
# एनर्जी लीडरशिप अवॉर्ड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :



महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना इंग्लंडच्या वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्सतर्फे ऊर्जा क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल नुकताच एनर्जी लीडरशिप अवॉर्ड २०२५ प्रदान करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात परिवर्तन चालू असून त्यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या कामामुळे हा सन्मान झाला आहे. महावितरणच्या कामगिरीत राज्याच्या ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर व अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. या पुरस्काराचे श्रेय महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना आहे, असे लोकेश चंद्र यांनी सांगितले.

वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्सचे प्रमुख पाब्लो स्टॅन्ले व अध्यक्ष हेन्री आर. यांच्या स्वाक्षरीने मा. लोकेश चंद्र यांना पुरस्कारस्वरूप प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स ही इंग्लंडमधील जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त संस्था आहे.

प्रशस्तीपत्रात म्हटले आहे की, ऊर्जा क्षेत्रातील असामान्य नेतृत्व, प्रशासनातील दूरदृष्टी आणि महाराष्ट्राच्या वीजवितरण क्षेत्रातील असामान्य योगदानाबद्दल मा. लोकेश चंद्र यांना एनर्जी लीडरशीप ॲवॉर्ड प्रदान करण्यात येत आहे. कार्यक्षमता, कल्पकता आणि सेवेबद्दलच्या समर्पित वृत्तीमुळे मा. लोकेश चंद्र यांनी अक्षय्य ऊर्जेच्या वापराला चालना देण्यासोबतच लाखो नागरिकांना भरवाशाचा वीज पुरवठा करण्यात प्रमुख भूमिका बजावली आहे.

अक्षय्य ऊर्जेचा वापर करून वीजखरेदी खर्चात मोठी बचत करून वीजदरात कपात करण्याची ऐतिहासिक कामगिरी महावितरणने केली आहे. अशा प्रकारे वीजदरात कपात करणारी महावितरण ही देशातील पहिलीच सार्वजनिक वीज वितरण कंपनी आहे. पुढील पाच वर्षात वीज खरेदीमध्ये अक्षय्य ऊर्जेवर भर दिल्यामुळे महावितरणची सुमारे ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याने पाच वर्षे वीजदरात कपात शक्य झाली आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठीच्या जगातील सर्वात मोठ्या विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाच्या अंमलबजावणीत लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. राज्यात ठिकठिकाणी सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारून त्यावर ४५ लाख कृषी पंप चालविण्याची ही १६,००० मेगावॅट क्षमतेची गेम चेंजर योजना आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळवून देणाऱ्या छतावरील सौर ऊर्जा निर्मिती योजनेमध्ये राज्यातील ग्राहकांनी नुकताच एक हजार मेगावॅटचा टप्पा ओलांडला. महाराष्ट्रात या योजनेची अंमलबजावणी महावितरण करत आहे. शेतकऱ्यांना हक्काची सिंचन व्यवस्था मिळण्यासाठी शेतात सौर कृषी पंप बसविण्यामध्ये महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेच्या अंमलबजावणीत महावितरणने देशात सर्वाधिक पंप बसविले आहेत.

# ओबीसी महासंघाचे नागपूरमधील उपोषण मागे

### १४ पैकी १२ मागण्या सरकारकडून मान्य : एका महिन्यात जीआर काढणार : अतुल सावेंची मध्यस्थी फळाला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याच्या मागणीला विरोध करण्यासाठी नागपूरच्या संविधान चौकात पाच दिवसांपासून सुरु असलेले राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे उपोषण अखेर मागे घेण्यात आले आहे. ओबीसींच्या १४ मागण्यांपैकी १२ मागण्या सरकारने मान्य केल्या असून, या मागण्यांसंदभार्तील शासन आदेश एका महिन्यात काढला जाईल, असे आश्वासन दिल्यानंतर ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी उपोषण थांबवण्याची घोषणा केली.

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी आझाद मैदानावर सुरू केलेले उपोषण सरकारने त्यांच्या काही मागण्या मान्य केल्यानंतर मागे घेतले. यावेळी हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सरकारने घेतला. या निर्णयामुळे ओबीसी समाजाच्या संघटनांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला.

नागपूरसह अनेक ठिकाणी सरकारच्या या निर्णयाची होळी करून मोर्चे काढण्यात आले. हैदराबाद गॅझेटमुळे ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागेल, असा आरोप ओबीसींकडून करण्यात येत होता. राष्ट्रीय ओबीसी महासंघाने नागपुरात सुरू केलेल्या साखळी उपोषणाच्या ठिकाणी आज मंत्री अतुल सावे आणि परिणय फुके यांनी भेट दिली.



ओबीसी आरक्षणाला गदा येणार नाही याची काळजी घेतल्याचे अतुल सावे आंदोलकांना म्हणाले. शेतकऱ्यांचे अतिवृष्टीने जे नुकसान झाले त्यावर प्रक्रिया सुरु केली आहे. ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा विषय आम्ही अर्थ मंत्रालयाकडे पाठवला आहे.

राष्ट्रीय ओबीसी महासंघाने आपल्या एकूण १४ मागण्या मांडल्या आहेत. ओबीसी वसतिगृहासाठी नागपूरमध्ये दोन इमारती उपलब्ध करून दिल्या जाण्याचा निर्णय झाला आहे. ओबीसी आर्थिक विकास महामंडळाच्या मागण्यांबाबत आम्ही सकारात्मक आहोत. १८ महामंडळ तयार केली आहेत. ५-५ कोटी रुपयांचा निधी दिलाय, आता ५०-५० कोटी निधी प्रत्येक महामंडळाला देणार आहोत. जिल्ह्याच्या ठिकाणी ओबीसींसाठी अभ्यासिका सुरु कु. महामंडळांना एक हजार कोटी पेक्षा जास्त निधी उपलब्ध होणार आहे, असे अतुल सावे म्हणाले.

**हैदराबाद गॅझेटमुळे ओबीसींना धक्का नाही**

हैदराबाद गॅझेटमुळे ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही, असे अतुल सावे यांनी स्पष्ट केले. हैदराबाद गॅझेटप्रमाणेच जी नावे असतील त्याप्रमाणेच त्यांना मिळणार आहे, त्यामुळे काळजी करण्याची काहीच गरज नाही, असेही त्यांनी सांगितले. यानंतर राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या १२ मागण्या आज सरकारने मान्य केल्या आहेत. आता आपण आपले उपोषण मागे घ्यावे अशी विनंती मंत्री अतुल सावे यांनी बबनराव तायवाडे यांना केली.

**एक महिन्यात शासन आदेश काढणार**

मंत्री अतुल सावे यांनी आश्वासन दिले की, मान्य करण्यात आलेल्या १२ मागण्यांबाबत एक महिन्याच्या आत शासन आदेश काढला जाईल. सरकारच्या या आश्वासनानंतर बबनराव तायवाडे यांनी उपोषण मागे घेतले. तसेच नागपूर व्यतिरिक्त लातूर, वडीगोद्री, कल्याण, ठाणे, गोंदिया, भंडारा याठिकाणी सुरू असलेले आंदोलन थांबवण्याच्या सूचना पदाधिकाऱ्यांना देणार आहोत.

यापुढे भविष्यात ओबीसीवर कुठल्याही प्रकारची गदा आल्यास, तेव्हा एवढ्याच ताकदीने आपण उभे राहू आणि ओबीसीच्या संविधानिक अधिकाराचे रक्षण करू, असे बबनराव तायवाडे म्हणाले. नागपूर येथे सुरू असलेले उपोषण अतुल सावे यांच्या हस्ते थांबवत आहोत, असे म्हणत बबनराव तायवाडे यांनी अतुल सावेंच्या हस्ते पाणी पिऊन उपोषण सोडले.

### ओबीसी महासंघाच्या प्रमुख मागण्या

- मराठा जातीचा ओबीसी संवर्गात समावेश करण्यात येऊ नये व सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात येऊ नये.
- ओबीसी मुलांना व्यावसायिक अभ्यासक्रमास शंभर टक्के शिष्यवृत्ती लागू करण्यात यावी.
- गुणवंत मुलांमुलीना परदेशात उच्च शिक्षणासाठी देण्यात येणारी शिष्यवृत्ती ७५ विद्यार्थ्यांची संख्या वाढवून २०० विद्यार्थी करण्यात यावी.
- महाज्योती या संस्थेकरिता एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी.
- बार्टीप्रमाणे महाज्योतीची कामे ओबीसी प्रवर्गातील संस्थेला देऊन रोजगार उपलब्ध द्यावा.
- म्हाडा व सिडको तर्फे बांधून देण्यात येणाऱ्या घरकुल योजनेत ओबीसी संवर्गाकरिता आरक्षण लागू करण्यात यावे.
- ओबीसी मुला व मुलींचे वसतिगृह ओबीसी बहुजन कल्याण विभागाकडे हस्तांतरित करावे.
- ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी आर्थिक विकास महामंडळामार्फत उपलब्ध करून देणाऱ्या कर्जासाठी फक्त शेती गहाण ठेवण्याची अट काढून टाकावी.

## वाघाच्या हल्ल्यात शेतकरी ठार



■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. ४ :

सावली वनपरिक्षेत्रअंतर्गत येणाऱ्या पाथरी उपवन क्षेत्रातील असोलामेंढा नहराला लागून असलेल्या शेतात निंदण करीत असलेल्या पांडुरंग भिकाजी चचाने या शेतकऱ्याला वाघाने शेतातून उचलून नेऊन ठार केल्याने खळबळ उडाली आहे. ही घटना समोर येताच गावात भीती व दहशतीचे वातावरण आहे.

पाथरी या गावातील पांडुरंग भिकाजी चचाने हा शेतकरी विरखल मार्गालगत लगत असोलामेंढा नहराला लागून असलेल्या शेतात गुरुवार ४ ऑगस्टचे सकाळी निंदनचे काम करीत होता. त्याच दरम्यान तिथे वाघाने आला आणि शेतकऱ्याला उचलून नेऊन ठार केल्याची खळबळ जनक घटना घडलेली आहे.

या घटनेची माहिती वन परिक्षेत्र विभागाला व पोलीस विभागाला देण्यात आलेली आहे. याच परिसरात वाघिणीने नुकताच पिलांना जन्म दिल्याची माहिती मिळत असून विरखल परिसरात शेतकऱ्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

ऐन शेतीच्या हंगामात वाघाचा धुमाकूळ सुरू झाल्याने शेतकरी भयभीत झाल्याने वाघाचा बंदोबस्त करावा अशी मागणी ग्रामस्थानी केली आहे. चंद्रपूर जिल्ह्याच्या विविध तालुक्यात वाघाच्या हल्ल्यात आतापर्यंत अनेक नागरिकांनी जीव गमावला आहे.

## सर्वसामान्य लोकांना लुटून
# दिवाळी साजरी करण्याचा प्रयत्न

### जीएसटीवरून विजय वडेट्टीवार यांचा हल्लाबोल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :



काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी जीएसटी कपात केल्याच्या मुद्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील नरेंद्र मोदी सरकारवर निशाणा साधला आहे. जीएसटी कर कमी करावा, त्यावर उंस्त्र लावावी ही मागणी विरोधी पक्षनेते राहुल गांधी गेले आठ वर्ष सातत्याने करत होते. निवडणुकीत फटका बसेल या भीतीने या सरकारने जीएसटी आज कमी केला आणि त्याचे श्रेय केंद्र सरकारला घ्यायचे आहे? गेली आठ वर्ष लोकांना लुटले त्याची जबाबदारी सरकार घेणार का?

जीएसटी कमी करता येत होता, तर केंद्राने मागील ८ वर्षात तो कमी का केला नाही? हे सरकार लोकांना लुटून आज दिवाळी साजरी करत आहे, असे ते म्हणालेत. दरम्यान, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अंबादास दानवे यांनीही या प्रकरणी केंद्रावर निशाणा साधत इंधन दरात दिलासा देण्याची मागणी केली आहे.

केंद्र सरकारने जीएसटीच्या आघाडीवर अनेक महत्वपूर्ण बदल केलेत. या बदलांतर्गत सरकारने १२ व २८ टक्क्यांचा स्लॅब पूर्णतः रद्दबातल केला आहे. आता केवळ ५ व १८ टक्क्यांचा स्लॅब आहे.

सरकारच्या या निर्णयामुळे अनेक जिवनावश्यक वस्तू स्वस्त होतील असा दावा केला जात आहे. नवे निर्णय आगामी सनासुदीच्या तोंडावर म्हणजे २२ सप्टेंबरपासून लागू होणार आहेत. या पार्श्वभूमीवर विजय वडेट्टीवार यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे.

वडेट्टीवार म्हणाले, हे सरकार जेव्हा लोकांवर अन्यायकारक जीएसटी लादत होते, तेव्हा काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आवाज उठवला आणि विरोध केला. जर जीएसटी कमी करता येत होता तर तो गेली आठ वर्ष का कमी केला नाही, याचे उत्तर सरकार देणार का? जनतेकडून ज्यादा टॅक्स वसूल का केला याचे उत्तर आधी द्यावे मग सरकारने श्रेय घ्यावे. लोकांना लुटले आणि आज दिवाळी साजरी करत आहेत, असे ते म्हणाले.

**पेट्रोल - डिझेल जीएसटीत आणा**

दुसरीकडे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अंबादास दानवे यांनीही या प्रकरणी केंद्रावर निशाणा साधला आहे.

त्यांनी या प्रकरणी इंधनदरात सवलत देण्याची मागणी करत पेट्रोल व डिझेलही जीएसटीच्या कक्षेत आणण्याची गरज व्यक्त केली आहे. सातआठ वर्षे जीएसटीच्या नावाखाली मध्यमवर्गीयांची कमाई खाल्ल्यावर आता बदल करण्याचे केंद्राला सुचले. हरकत नाही. मात्र, पेट्रोल-डिझेलला जीएसटीच्या कक्षेत आणण्यासाठी सरकारं तयार नसल्याचे दानवे म्हणाले.

## एका दिवसात ३९४ प्रवाशांची धरपकड

### २.९१ लाख रुपये दंड वसूल

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ४ :

मध्य रेल्वेवरून विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून तिकीटधारक प्रवाशांची गैरसोय होत आहे. यासंदर्भात प्रवासी सातत्याने रेल्वे प्रशासनाकडे तक्रार करीत आहेत.

या तक्रारींची दखल घेऊन मध्य रेल्वेने आता विनातिकीट प्रवाशांना रोखण्यासाठी कंबर कसली आहे. मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागातील आठ रेल्वे स्थानकांवर विशेष तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली. एका दिवशी सुमारे ३९४ प्रवाशांना पकडून २ लाख ९१ हजार ६४० रुपये दंड वसूल करण्यात आला.

या विशेष तिकीट तपासणी मोहिमेत ७३ तिकीट तपासणीस आणि रेल्वे सुरक्षा दलाचे (आरपीएफ) १० कर्मचारी सहभागी झाले होते. या मोहिमेत रेल्वेच्या हद्दीत व्यवसाय करणाऱ्या चार अनधिकृत विक्रेत्यांवरही कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान अनेक प्रवासी नियमबाह्य पद्धतीने प्रवास करताना आढळले. त्यात विनातिकीट प्रवास करणे, आरक्षित डब्यातून चुकीच्या तिकिटावर प्रवास करणे, जादा सामान स्वतःजवळ बाळगणे आदी प्रकरणी कारवाई करण्यात आली. रेल्वे कायदा कलम १४५(ब) अंतर्गत ही कारवाई करण्यात आली.

प्रवाशांना सुरक्षित, सुकर व आरामदायक प्रवासाची सुविधा देण्याच्या प्रयत्नाचा भाग म्हणून, रेल्वे नियमितपणे मेल-एक्स्प्रेस, पॅसेंजर, विशेष ट्रेनसह व्यापक तिकीट तपासणी मोहीम राबवत असते. स्थानक तपासणी, अचानक धाड तपासणी, किल्लाबंदी तपासणी, व्यापक तपासणी व मेगा तिकीट तपासणी मोहिमांचा यात समावेश आहे.

मध्य रेल्वेने एप्रिल ते जुलै २०२५ या कालावधीत तिकीट तपासणीत विनातिकीट १४.४३ लाख प्रवाशांना पकडले असून त्यांच्याकडून एकूण ८६.७३ कोटी रुपयांचा दंड वसूल केला आहे. या कारवाईमध्ये भुसावळ विभाग अव्वल आहे.

## : सिनेरंग :

### पर्वतांच्या कुशीत सुरू होणार मनाचे श्लोकचा प्रवास

लोकरंजन

आयुष्य हा एक प्रवास आहे, कधी सोपा, कधी कठीण, तर कधी भावनांनी भरलेला. या प्रवासाला पर्वतांची साथ आणि मनाच्या नात्यांची ऊब मिळाली तर तो प्रवास खास ठरतो. अशीच एक वेगळी गोष्ट मनाचे श्लोक या चित्रपटातून प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे.

या चित्रपटात मनवा आणि श्लोक यांचा प्रवास दाखवला असून, त्यात त्यांची नाती, विचार आणि स्वप्नं यांचा सुंदर संगम दिसणार आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या मोशन पोस्टरमध्ये ते दोघे पर्वतांच्या दिशेने चालत निघाल्याचं दिसत असून, त्यांचे पाठमोरे रूप या प्रवासाच्या कहाणीची उत्सुकता वाढवतं. या प्रवासात त्यांचं प्रेम फुलणार का, त्यांच्या सोबत आणखी कोण असेल, ते काय मागे सोडून आले आहेत आणि डोंगर त्यांना कोणत्या नव्या दिशेने नेत आहेत, हे जाणून घेणं प्रेक्षकांसाठी नक्कीच रंजक ठरणार आहे. या चित्रपटात मृण्मयी देशपांडे, राहुल पेठे, पुष्कराज चिरपुटकर, सुव्रत जोशी, सिद्धार्थ मेनन, हरीश दुधाडे आणि करण परब यांची भूमिका आहे.

मनाचे श्लोक हा चित्रपट १० ऑक्टोबरला प्रदर्शित होणार असून, याचे लेखन व दिग्दर्शन मृण्मयी देशपांडे यांनी केले आहे. चित्रपटाचे निर्माते श्रेयश जाधव आणि संजय दावरा असून, हा चित्रपट स्टारलाईट बॉक्स थिएटर्स व नितीन वैद्य प्रॉडक्शन्स यांनी सादर केला आहे.

■ ■ ■




### साबर बोंडं चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित




जगविख्यात सनडान्स फिल्म फेस्टिव्हल २०२५ मध्ये झळकलेल्या साबर बोंडं (केक्कस पिअर्स) या चित्रपटाचे मुंबईत पार पडलेल्या विशेष पत्रकार परिषदेत ट्रेलर अनावरण करण्यात आले.

दिग्दर्शक रोहन परशुराम कानवडे लिखित हा चित्रपट येत्या १९ सप्टेंबर २०२५ रोजी संपूर्ण देशभरात प्रदर्शित केला जाईल. प्रसिद्ध अभिनेता राणा दग्गुबटी यांच्या स्पिरिट मीडिया यांच्यातर्फे या चित्रपटाचे वितरण केले जाईल. या अगोदर स्पिरिट मीडियाने कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये झळकलेल्या ग्रँण्ड प्रिक्स विजेता ऑल वी इमॅजिन अज लाईट हा चित्रपट भारतात प्रदर्शित केला आहे.

सनडान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये जगभरातून तब्बल १७ हजार चित्रपटांचे पुरस्कारांकरिता अर्ज आले होते. साबर बोंडं हा सनडान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये प्रवेश करणारा पहिला भारतीय चित्रपट ठरला. सनडान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये हा चित्रपट प्रदर्शितही झाला. या चित्रपट महोत्सवात प्रदर्शित झालेला हा पहिला मराठी चित्रपट ठरल्याने नवा इतिहास रचला गेला.

साबर बोंड हा चित्रपट आनंद नावाच्या शहरी तारुण्याच्या आयुष्यभोवती फिरतो. आनंद आपल्या वैयक्तिक आयुष्यात दुःखी आहे. कौटुंबिक दडपणात जगणाऱ्या आनंदला एकदा आपल्या मूळ गावी जावे लागते. अंत्यसंस्कारा नंतरच्या दहा दिवसांच्या विधीसाठी आनंद आपल्या गावी परततो.

पश्चिम महाराष्ट्राच्या निसर्गरम्य वातावरणात वसलेल्या गावात आनंदला त्याचा बालपणीच मित्र बाल्या भेटतो. बाल्याच्या संपर्कात आल्यावर आनंदला त्याच्या दुःखावर फुंकर घातली जाते. त्याला आपुलकी मिळते. बाल्या आनंदचे सांत्वन करतो.

साबर बोंडं या चित्रपटात अभिनेता भूषण मनोज, सूरज सुमन आणि जयश्री जगताप यांचा सशक्त अभिनय पाहायला मिळतो. प्रेम आणि मैत्रीच्या नाजूक बंधांचा या चित्रपटात हळूवारपणे वेध घेतला गेला आहे. या निर्माते नागराज मंजुळे, निखिल अडवाणी, सई ताम्हणकर आणि विक्रमादित्य मोटवानी यांनी कार्यकारी निर्मात्याची जबाबदारी सांभाळली आहे.

■ ■ ■

### किर्लोस्कर कुटुंब आलं पारू आदित्यसाठी एकत्र!



प्रत्येक आठवड्याला नवीन ट्विस्ट्स घेऊन येणारी पारू मालिका सध्या एका हृदयस्पर्शी वळणावर आहे. पारू अनेक अडचणी, विरोध, आणि नात्यांच्या चाचण्यांमधून मार्ग काढत इथवर आली आहे. पण आता तिच्या या संघर्षाला अखेर गोड फळं मिळू लागली आहेत. कधी सावध पावलांनी, तर कधी हिम्मत दाखवत प्रत्येक अडथळ्याचा सामना करणारी पारू, आता तिच्या नात्यांना घरात जागा मिळताना दिसत आहे. आदित्यसोबतचं तिचं गुपित उलगडलं असतानाही, कुटुंबाची साथ, वडिलांचं स्वीकार, आणि आदित्यच्या प्रेमातली दृढता या सगळ्यामुळे तिच्या जीवनात आता आनंदाची पहाट उमटू लागली आहे. आदित्य आणि पारूच्या नात्याचा खुलासा झाला असून, त्यांच्या गुप्त विवाहाची बातमी अखेर किर्लोस्कर कुटुंबासमोर उघड झाली आहे. अहिल्या आदित्यच्या भविष्यासाठी काळजी करत असताना त्याला योग्य निर्णय घेण्याची सतत आठवण करून देते.

दुसरीकडे, आदित्य आणि पारू गुपचूप संसाराचा आनंद घेत असताना, त्यांचे हळवे क्षण, आणि एकमेकांतली आपुलकी प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. जेव्हा श्रीकांत पारूला चूड्या भेट देतो आणि तिला सून म्हणून संबोधतो. त्याचा हा निःशब्द स्वीकार ही एक सशक्त भावना ठरते. मात्र हे पाहून दिशा गोंधळ घालणार आहे. यावेळी किर्लोस्कर कुटुंब एकत्र येत कबूल करतात की त्यांना आधीपासूनच आदित्य पारूचं गुपित माहित होतं! या धक्क्याने दिशा गप्प होते. या बदललेल्या वागणुकीमुळे दिशा मानसिकदृष्ट्या अडचणीत सापडणार आहे. तेव्हा बघायला विसरू नका पारू दररोज संध्या ७:०० वा. फक्त झीमराठी वर.

■ ■ ■

### चिंकी-मिंकीने छोरियां चली गाव मध्ये प्रेक्षकांची मनं जिंकली

झी टीव्हीचा रिॲलिटी शो छोरियां चली गाव हा धैर्याची अंतिम परीक्षा बनला आहे, ज्यामध्ये अकरा शहरी महिला सेलिब्रिटींनी त्यांचे ग्लॅमरस शहरी जीवन ग्रामीण भारतातील ग्रामीण वास्तवासाठी बदलले आहे. सर्वात जास्त चर्चेत असलेल्या सहभागींमध्ये समृद्धी मेहरा आणि सुरभी मेहरा आहेत ज्यांना चिंकी-मिंकी म्हणून ओळखले जाते.

गायींचे दूध काढण्यापासून ते चुलीवर स्वयंपाक करण्यापर्यंत, पाणी आणण्यापासून ते गावातील असंख्य कामे पूर्ण करण्यापर्यंत, जुळे मॉडेल स्पर्धक असल्याचे सिद्ध होत आहेत. त्यांच्या शिस्त, टीमवर्क आणि आनंदी भावनेने त्यांच्या सह-स्पर्धकांना केवळ प्रभावित केले नाही तर प्रेक्षकांची प्रशंसा देखील मिळवली आहे. पण त्यांच्या परिश्रमामागे एक खोल भावनिक कथा आहे.




तिच्या मुलींना प्रत्येक काम इतक्या प्रामाणिकपणे करताना पाहून त्यांच्या आईला अनेकदा भारावून जाते आणि अश्रू अनावर होतात. तिच्यासाठी, चिंकी-मिंकी परिपूर्ण विद्यार्थी आहेत जे नेहमीच त्यांचे १००% योगदान देतात, नेहमी एकमेकांच्या पाठीशी उभे राहतात. तरीही, तिच्यासाठी हा प्रवास सोपा नाही. ती एक धाडसी चेहरा धारण करते, तिच्या मुलींना स्वतःहून चमकू देते आणि संघर्ष करू देते, तर शांतपणे वेदना सहन करते. ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com


# AGRICULTURE PRODUCE MARKET COMMITTEE,
## LAKHANI DIST BHANDARA

**E TENDER NOTICE**

The Agriculture Produce Market Committee, Lakhani Dist Bhandara invite the E-Tender in B-1 form (% Rate) from the contractors with previous experience in executing the similar works for the **Estimate for the construction of Ground Floor (Meeting Hall) and First Floor for Office Building, Providing the Electrification, Interior Decoration, Landscaping and Parking Shed in the premises of Main Market Yard, Agriculture Produce Market Committee Lakhani on Gat No. 570(A), at Mouza-Lakhani, Tah-Lakhani Distt-Bhandara.** The receipt of tender is from Dt 04/09/2025 to Dt 11/09/2025 and pre bid meeting will be held on Dt 08/09/2025. Other Details can be seen in the bid document. The tender can be downloaded from website www.mahatenders.gov.in.

**Mr. Sanjay Gajanan Parode** Secretary | **Mr. Vinayak Somaji Burde** Vice Chairman | **Mr. Shivram Sonbaji Girhepunje** Chairman